म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. ९५५१
१९६१




REFBK-0011986
REFBK-0011986

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 32036 दि: [illegible]
क्रमांक [illegible] नों: दि: [illegible]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 320२८० वि: ०१०५
क्रमांक ...१.५५१...... नों: दि: २१/५/५१

# गीत - गोविन्द

REFBK-0011986
REFBK-0011986

११९८६

मनोहर कवीश्वर

प्रकाशक : मधुसूदन कलामंदिर, अमरावती
मुख्य विक्रेते : ठाकूर आणि कंपनी लिमिटेड, अमरावती

मूल्य अडीच रुपये

○ प्र का श क ○

प्रभाकर श्री. घांडे

मधुसूदन कलामंदिर

अ म रा व ती.

○ मु द्र क ○

व. ना. ठाकूर, प्रधान संचालक

महेश्वर मुद्रणालय, अमरावती.

○ चि त्र का र ○

मुखपृष्ठ : श्री. करीम, सिने आर्टिस्ट सेंटर, अमरावती.

रेखाचित्रें : श्री. कृष्णराव पाटील, अमरावती.

यमुनातटि : श्री. मुकवाने चित्रकार, अमरावती.

कृष्णजन्म : श्री. निशिकान्त बोडे

कंसवध : श्री. वसन्त टेंभरे

चिंधी : कुमार निरंजन कवीश्वर

●

टीप : या पुस्तकांतील उतारा अथवा संगीतिका पुनर्मुद्रित करण्यास अथवा यांतील गीतांचा–पृथक् अथवा सामूहिक–प्रयोग करण्यापूर्वी लेखी परवानगी घ्यावी लागेल. यासंबंधी पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावा.

सौ. मंगला म. कवीश्वर

नमुना

अ म रा व ती

या व यापुढील सर्व आवृत्तींचे हक्क सौ. मंगला म. कवीश्वर यांचे स्वाधीन.



श्रीमती अ. वे. कल्याणीबाई मुदलियार

हो तुझी प्रेरणा—
म्हणून माझ्या नव-प्रतिभेचा कल्पतरू फुलला !
इवले कोमल अंकुर कांही अर्पुनिया तुजला,
करितों देवी, तुझी अर्चना ! !

अमरावती
दि. १०।९।६१

★ मनोहर कवीश्वर

# शुभाशीर्वाद

★

( दि. २९ जून १९६१ रोजीं श्री शिवाजी शिक्षणसंस्थेच्या बी. टी. कॉलेजमध्ये निमंत्रित सज्जनांपुढे झालेल्या 'गीत–गोविंद 'च्या कार्यक्रमप्रसंगीं पूज्य भाऊसाहेब देशमुख यांनी काढलेले प्रशंसोद्गार...! )

आमच्या श्रीशिवाजी शिक्षणसंस्थेंतून तयार झालेल्या अनेक गुणवान् मुलांपैकी मनोहर कवीश्वर हा एक होय! लहानपणापासून त्याची कला वृद्धिगत होत असतांना मी पाहिली आहे! तो 'गुणी' आहे असें वाटे पण तो इतका 'गुणी' असेल असें कधीच वाटलें नव्हतें. आज त्याचें 'गीत–गोविन्द' ऐकून मी साभिमान आश्चर्यचकित झालों आहे. भगवान् श्रीकृष्णाचें तेजस्वी चरित्र सोप्या भाषेंत व आकर्षक चालींत गुंफलें असल्यामुळे करमणुकी-



डॉ. पंजाबराव ऊर्फ भाऊसाहेब देशमुख

च्या कार्यक्रमासाठी कमी वेळ असलेल्या माझ्यासारख्या माणसाला अडीच-तीन तासांत उठून जावेसें वाटलेंच नाही! गीतांतील स्वर आणि शब्दांचा संयोग आणि त्यांना मिळणारा गायक व वादकवृंदाचा उठाव यामुळ

गीतांची रसाळता श्रोत्यांस पुरेपूर अनुभवास येते ! प्रा. मनोहर कासलीकर यांचें श्रुतिमधुर गायन; श्री. कोळेश्वर यांचें मोहक बांसरीवादन; श्री. मदनसिंह आणि श्री. दळवी यांचें तबलावादन आणि इतर वाद्यांची साथ असल्यामुळे ह्या कार्यक्रमाची विविधता एकसारखी टिकून राहते !

काव्याचा विचार करतांना मला एकदम ज्ञानेश्वरांची आठवण झाली ! ज्ञानेश्वरांची भाषा 'अमृतातें पैजा जिंकणारी' असली आणि प्राकृत असली तरीहि आज सामान्य जनतेला ती कळत नाही ! 'गीत-गोविन्दांतील' गीता चिमुकली असली तरी सर्वांना समजूं शकते ! तसेंच, या गीतमालेतील Climax किंवा उत्कर्षबिंदु माझ्या मतें भगवद्गीता नसून "माझा प्राण हा परमेश्वर मी स्वामी पतितांचा ।" हें गीत होय ! 'सुदामा'च्या गीतांतील राजकारणाची छाया हृदयस्पर्शी आहे. तसेंच, मला विशेष आवडलेली गोष्ट म्हणजे गीतांतून केलेल्या अस्सल वऱ्हाडी शब्दांचा उपयोग. उदाहरणार्थ—आभाळ; धस्सकन् उठता वगैरे. पेंद्याचें बोबडें गाणें तर मी कधींच विसरणार नाही !

...एकंदरीत सर्वच गीतें मनोरंजक व रसपरिपोषक वाटलीं ! हा कार्यक्रम ऐकत असतांना मला अचानक पहाडी सन्याल यांनी सादर केलेल्या 'गंगावतरण' या अप्रतीम गीत-नाट्याची आठवण झाली... 'गंगावतरण' पाहिल्यापासून 'शांतिनिकेतन'च्या पद्धतीचें एक 'कलाकेंद्र' विदर्भांत असावें, अशी एक कल्पना माझ्या मनांत मूळ धरून बसली आहे! मनोहर कवीश्वर, तसेंच त्यांचे मित्र नृत्यकार श्री. निशिकान्त बोडे—हेहि तुमच्या संस्थेचे विद्यार्थीच आहेत—यांच्यासारखे कलावन्त तरुण मला सहकारी लाभले तर कलाकेंद्राचें माझें स्वप्न साकार होण्यास फार वेळ लागणार नाहीं !

'भक्ति-गोविन्द'च्या रूपानें जी लहानशी संघटना तयार झाली आहे तिचें जितकें कौतुक करावें तितकें थोडेंच आहे ! हा कार्यक्रम अखिल महाराष्ट्रांत लोकप्रिय होईल असा माझा ह्या मंडळास शुभाशीर्वाद आहे !

अमरावती
दि. २९ जून १९६१

**पंजाबराव देशमुख**

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 32036 वि: काव्य
क्रमांक 9451 नों. दि. 5-5-62

# पुरस्कार

★

माझे विद्यार्थी-मित्र श्री. मनोहर कवीश्वर यांच्या प्रस्तुत 'गीत-गोविन्द' या गीतमालेचा पुरस्कार करितांना मला फार आनंद वाटतो. सुमारे गेल्या दहा वर्षांपासून मी त्यांना ओळखतों. ते हाडाचे कलावंत आहेत व आपल्या आवडत्या छंदाकरिता कितीहि कष्ट पडले, कोणताहि त्याग करावा लागला तरी तो करण्याची त्यांची तयारी असते. एखादें कार्य अंगावर घेतल्यावर त्याच्या पूर्ततेकरिता अक्षरशः तन-मन-धनाने ते खपत असतात व त्या कार्याशी सर्वस्वी एकरूप होतात. गुरु द्रोणाचार्य कौरवपांडवांना धनुर्विद्येचें शिक्षण देत असतांनाचा एक प्रसंग मला आठवतो. असें म्हणतात की धनुर्विद्येची परीक्षा घेत असतांना एका झाडावर एक लांकडी पक्षी ठेवण्यांत आला होता व त्याच्या डोळ्यावर तिरंदाजाने तीर नेमका मारावयाचा होता. प्रत्येक परीक्ष्यार्थी नेम धरून बाण सोडण्याच्या पवित्र्यांत उभा राहिला कीं द्रोणाचार्य त्याला विचारीत. 'वत्सा, तुला काय काय दिसतें?' कुणाला संपूर्ण वृक्ष, आकाशाची पार्श्वभूमि इत्यादि गोष्टी दिसत व त्यामुळे त्यांचा नेम अचूक लागेना. अर्जुनाला मात्र लक्ष्य असलेला तेवढा पक्ष्याचा डोळाच फक्त दिसत होता व म्हणून त्याच्या बाणाने बरोबर लक्ष्यवेध साधला. ही 'एकाग्रवृत्ति' कलावंतालाहि आवश्यक असते असें मला वाटतें व तिचा आढळ भरपूर प्रमाणांत मला श्री. कवीश्वर यांच्या ठिकाणीं दिसतो म्हणून त्यांच्या पाठीवर आज कृतार्थतेची ही थाप मारतांना मला कसलाच संकोच वाटत नाही. सहृदयता, रसिकता, 'बहुतांचीं अंतरें' राखण्याची मनमिळाऊ वृत्ति, निरलस कष्टाळूपणा व अंगीकृत कार्यावरील भक्तिवजा निष्ठा या गुणांनी त्यांचें व्यक्तिमत्त्व विनटलेलें असल्याने परिस्थिति मोठीशी अनुकूल नसूनहि त्यांना सुयश प्राप्त होईल असा विश्वास वाटतो. संगीत व नाट्य हे कलाविषय त्यांच्या नित्य अभ्यासाचे विषय आहेत व त्यांचा तात्त्विक व प्रायोगिक अभ्यास अनेक वर्षांपासून त्यांनी केलेला आहे.

प्रस्तुत गीतमाला गुंफण्याची स्फूर्ति त्यांना 'गीतरामायण' या श्री. ग. दि. माडगूळकर यांच्या यशस्वी कलाकृतीवरून मिळाली असावी हें स्पष्ट आहे. गीतरामायणांतील 'पराधीन आहे जगतीं पुत्र मानवाचा।' ही ओळ प्रस्तुत गीतमालेंतील 'सुवर्ण-तुला' या नाटचगीतांतील 'प्रियाधीन आहे जगतीं पुत्र मानवाचा' या चरणाची जन्मदात्री आहे हें अगदी उघड आहे. भारतीय मनाला रामकथा व कृष्णकथा यांनी पुरातनकालापासून सदैव मोह घातलेला आहे व म्हणून एक कथा गीतरूपाने अवतीर्ण झाल्यावर दुसरीहि अवतरावी हें क्रमप्राप्तच आहे.

प्रस्तुत गीतमालेचा जन्म अशा अनुकरणांतून झालेला असला तरी तिचा विलास हा मात्र सर्वस्वी मौलिक आहे. या गीतमालेंत श्रीकृष्ण-चरित्रांतील सुमारे २० प्रसंगांवर गीतें रचलेलीं आहेत. तीं सर्व भावगीतेंच नसून भावगीतें व नाटचगीतें आहेत. त्यामुळे या गीतमालेचा सांघिक कार्यक्रम ऐकत असतां श्रीकृष्णचरित्र आपल्या मनश्चक्षूंसमोर घडत असल्याचा भास होतो. वाद्यवृंदाची साथ व प्रकाशयोजनेचें चातुर्य यांच्या सहाय्याने मन:पटलावर चरित्ररेखाटन केलें जातें व गीतांतील रसाळ शब्दयोजनेने अंत:करण विरघळून जातें. भगवान श्रीकृष्णाचें चरित्र म्हणजे अनेक रसांचा परिपाक घडवून आणणारें रसायनच आहे व विशिष्ट भावांचा योग्य परिपोष करणारी नादमधुर शब्दरचना साधली असल्याने रसनिर्मिति सहज होते. शब्द आणि अर्थ यांचें रमणीय साहचर्य आढळत असल्याने हें खऱ्या अर्थाने 'साहित्य' बनलें आहे.

'गडगडलें आभाळ, नौबती मेघांच्या झडती' ही कृष्णजन्मप्रसंगीची पहिलीच ओळ ऐकतांना वातावरणनिर्मिति किती सहजगत्या होते याचा अनुभव येतो !

**'सौभाग्यासह निज भगिनीला दुर्भागीं जखडिलें**
**त्या दीनांचे शापित अश्रू, जलधारा पडती॥'**

असल्या मनोहर चरणांतून कवीच्या कल्पनाविद्युल्लतेची चमक दृष्टि स्तिमित करते.

थोडया शब्दांतून 'रस' निर्माण करण्याचें सामर्थ्य श्री. कवीश्वर यांच्या वाणींत अमूप आढळतें. कृष्णबलरामांना गोकुळांतून मथुरेला नेण्यास 'अक्रूर' आला तेव्हा अक्रुराला ज्या सूचना 'सागरचित्ता यशोदेवीने' दिल्याचें कवीने वर्णन केलें आहे त्यांतून तिच्या प्रेमळ अन्तःकरणाचें दर्शन फार सुलभतेने घडविलें गेलें आहे. कवि म्हणतोः—

***"देवकिला मम निरोप द्यावा अक्रुरजी सांगोनी**
**रोज सकाळीं मम कृष्णाला लागे भाकरलोणी।। "**

साध्या प्रसादगुणयुक्त शब्दांनी मूर्तिमंत चित्र कवि रेखाटतो व निरलंकृत रचनेंतहि परिणामकारकता कशी आणतो तें पाहण्यासारखें आहे;—जेव्हा मानवी जीवनांतील मार्गदर्शक तत्त्वें तो अशा रीतीने मांडतो तेव्हा तर फारच कौतुकास्पद रचना होते. उदा:—श्रीकृष्णांनी नरकासुराचा वध करून त्याच्या बंदींतील सोळासहस्र कुलकन्यकांना मुक्त केलें व त्यांचें भावी जीवन सुखाचें व्हावें म्हणून 'पतित' समजल्या गेलेल्या त्या 'अमलांशी' स्वतःच विवाह केला तेव्हा थोरामोठयांनीहि त्याच्या धीरोदात्ततेचें कौतुक न करतां त्याला 'भोगी' म्हणून हेटाळलें. त्यांना कृष्णाने दिलेलें उत्तर पुढील कवितापंक्तींत साकार केलें आहे—

**'माना मानव, वा परमेश्वर, मी स्वामी पतितांचा**
**'भोगी' म्हणुनि उपहासा, मी 'योगी' कर्माचा!'**

गीताप्रसंगीचा कृष्णोपदेश एकाच गीतांत ग्रथित करतांनाहि कवीने हेंच कौशल्य व्यक्त केलें आहे.

**"विमोह त्यागुन कर्मफलाचा, सिद्ध होइ पार्था।**
**कर्तव्याने घडतो माणुस, जाणुन पुरुषार्था।।"**

कृष्ण काळा म्हणून त्याच्या सवंगडयांनी त्याची जी चेष्टा केली त्याचें नाटयमय दर्शन एका गीतांतून घडविलें गेलें आहे. तेथील 'बोबडी शब्दरचना' व 'बोलणाऱ्या मुलाच्या तोंडीं शोभतील अशा कल्पना'

---

* क्षमस्व! या ओळी 'सूरदास' या प्रसिद्ध हिंदी कवीच्या पदांतून अनुवादित केल्या आहेत. **—ग्रंथकर्ता**

घालण्यांत कवीने फार वरच्या दर्जाची कलाभिज्ञता व्यक्त केली आहे. यशोदेकडे कृष्णाच्या खोड्यांची कागाळी करण्यास आलेल्या गवळणींच्या निवेदनांत व यशोदेच्या कृतींतहि अशीच नाट्यमयता फार चांगल्या रीतीने साधली गेली आहे.

'चाललों गे माउली मी सोडुनी तव साउली' हें भावगीत तर या कविताहीरकांतील कोहिनूर आहे. त्यांतील आर्त भावना, कोमल शब्द व तरल कल्पना हृदयाचा ठाव घेतात.

**'रांगलों गेहीं तुझ्या गे, प्राशिली ममता तुझी ।**
**पावलांनी चाललों तव, बोललों वाणी तुझी ॥'**

असल्या ओळी कोणाहि सहृदयाच्या ओठांवर गुणगुणल्या जातील.

भारतीय भाविक मन परमेश्वराचे दहा अवतार मानतें व त्यांतील श्रीकृष्णावतार हा तर पूर्णावतार. त्यामुळे 'राजा' श्रीकृष्णाच्या राजवटींत शासनाचे सर्व उत्कृष्ट गुण त्याला आढळल्यास नवल काय? 'राजा' श्रीकृष्णाच्या शासनाचें वर्णन करतांना आधुनिक 'सुराज्या'च्या कल्पनांची गुंफण कवीने सहज ओघांत केली आहे हें सूक्ष्म जाणकारांच्या लक्षांत यावें असें वाटतें.

**'कर्तव्याला मुकतां माणुस, माणुस ना उरतो,**
**हलाहलाते प्राशुन शंकर देवेश्वर ठरतो'**

यांतून व 'रे सुदामा!' या गीतांतून आधुनिक कल्पनांचे पडसाद ऐकू येतात.

असें हें भावमधुर परिणामकारक काव्य आहे. पण तें केवळ 'वाचनीय' नाहीं; 'श्रवणीय' आहे. अनेक वाद्यांच्या मेळासह त्याचें 'श्रवण' हें त्यांतील 'नाट्यगुणांना' योग्य असा उठाव देतें व श्रीकृष्ण-चरित्राचा पट श्रोत्यांच्या समोर उलगडला जातो, हा साक्षात्कार अनुभविण्याचा योग मला दोन वेळा आला.

महाराष्ट्रांतील रसिक, अशा गुणी कलावंतांना उदार मनाने उत्तेजन देवोत अशी आशा व्यक्त करतों.

अमरावती
दि. १।९।१९६१

**—कृ. व्यं. पेशकार**

# श्रद्धांजलि ★ ★ ★

मधुसूदन कलामंदिराच्या संस्थापकांपैकी श्री. भगवानदास काश्यप हे एक होते ! कलामंदिराचे ते एकमेव तबलावादक होते... आज खरंच आमचा



'ताल' गेला आहे...कारण ते कलामंदिराचे व्यवस्थापक होते...कलामंदिराच्या कामासाठी त्यांनी अविश्रान्त परिश्रम केले आहेत. त्यांच्या या अचानक कालवश होण्यामुळे कलामंदिराचीच नव्हे, तर अवघ्या अमरावतीची कलेच्या क्षेत्रांत हानि झाली आहे !

श्री. भगवानदास यांच्या सारखा तबलावादक दुसरा मिळेल ..भिंतीवरील नक्षीकाम रंगविणारा नवीन एखादा कलावन्तहि मिळेल... शिडीवर स्वत: चढून नाटकाचे पडदे स्वत: बांधणारा कष्टाळू व्यवस्थापकहि मिळेल...पण एवढें सगळें असूनहि आपल्या अलौकिक बुद्धिमत्तेने मोठमोठ्या सुशिक्षितांना स्तिमित करणारा दर्जेदार विनोद करून तासन्‌तास हंसविणारा भगवानदास आम्हांस पुन: मिळणें अशक्य आहे ! गीत–गोविंदाच्या कार्यक्रमावर त्यांची निष्ठा होती...हिंदी 'गीत–गोविंदा'ची ते अधीरतेने वाट पाहात होते.. पण काळाला तें मंजूर नव्हतें...!

पुस्तकप्रकाशनाच्या सहाच दिवस आधी आमचे एक निष्ठावन्त कार्यकर्ते आम्हास सोडून गेले ! त्यांच्या नांवामागे 'कैलासवासी' हे दुर्दैवी शब्द जोडतांना सारें धैर्य कोसळून जातें ! असो. आम्ही त्यांच्या इच्छेप्रमाणे कलामंदिराचें कार्य अखण्ड चालू ठेवू !

ईश्वर मृतात्म्यास शांति देवो !

**सदस्य**

दि. ४–९–६१

**मधुसूदन कला–मंदिर,**

अमरावती.

# मनोगत!

भगवान श्रीकृष्णाच्या चरित्राइतकीच "गीत-गोविंदा"ची कहाणीहि अद्भुत आहे. माझे परम मित्र गुरुवर्य श्री. दिगंबर के. बपोरीकर यांनी आग्रहपूर्वक मला 'गीत-रामायण' ऐकण्याची संधि दिली नसती तर कदाचित् श्री. ग. दि. माडगूळकर व श्री. सुधीर फडके यांच्या अलौकिक कलाकृतीचें दर्शन मला कदापि झालें नसतें!

कांही पुराणांतून पूर्णावतार कृष्णाला रामचंद्राचा अवतार मानण्यांत आलें आहे. याबद्दल मतभेद असणें शक्य आहे; पण 'गीत-गोविंद' मात्र निश्चित गीत-रामायणाचाच अनुकार आहे हें प्रामाणिकपणें मला कबूल करावेसें वाटतें. भगिनी सौ. इंदुताई खांडेकर यांनी स्वतः गीत-रामायणाचे कार्यक्रम केलेत. त्या वेळीं त्यांची साथ करतां करतां गीत-रामायणांतील काव्य व संगीत यांचा थोडाबहुत अभ्यास मी करूं शकलों! त्यांतील चाली सौ. इंदुताई खांडेकरांनी परिश्रमपूर्वक मला सांगितल्या—नव्हे शिकविल्या! त्यांची कन्या व माझी एक आवडती विद्यार्थिनी कु. जयश्री खांडेकर हिने तर गीत-रामायणाच्या चालींतील इतके बारकावे मला समजावून दिलेत की, स्वरशृंगाराचा अलौकिक खजिनाच सापडला आहे असें मला वाटलें! त्यांचें असें ऋण चक्रवाढ व्याजाच्या दराने वाढण्यानेच मी संपन्न होणार आहे!

आमच्या बापूजींची फार जुनी इच्छा होती की, मीं कृष्णचरित्रावर गीतें तयार करावींत! आणि ती त्यांची इच्छा गतवर्षी पूर्ण होऊं शकली! अमरावतीचे रसिकाग्रणी श्री. डॉ. मदनगोपाल यांच्या मातोश्री श्रीमती कल्याणीबाई मुदलियार यांनी गतवर्षी मला आज्ञा केली की, त्यांच्या घरीं दरवर्षी होणाऱ्या कृष्णाष्टमीच्या उत्सवप्रसंगीं मीं कृष्णचरित्रपर १०–१२ गाणीं तयार करून गावींत. माझ्या यशोदेवतेचें स्मरण करून मीं गोकुळ-

अष्टमीच्या रात्रीं 'गीत-गोविंद' लिहायला सुरुवात केली! व चार दिवसांनंतर त्याचा कार्यक्रमहि डॉ. मदनगोपाल यांच्या घरीं मीं प्रस्तुत केला! तो कार्यक्रम विस्कळीत स्वरुपाचा असून देखील अमरावतीच्या रसिकांना आवडला... डॉ. मदनगोपालांच्या आईंनी तर तोंड भरून माझें कौतुक केलें!

माझ्यावर धाकट्या भावाप्रमाणे ममता असलेले श्री. बाळासाहेब हिरूरकर व त्यांच्या मातोश्री परमपूज्य श्रीमति अनसूयाबाई हिरूरकर व मातृतुल्य सौ. सुशीलाबाई गोखले यांच्या उत्कट इच्छेमुळे व सक्रिय प्रयत्नामुळे गीत–गोविंदाचे अनेक कार्यक्रम होऊन दिवसेंदिवस त्यास लोकप्रियता लाभूं शकली!

तसेंच, मधुसूदन कलामंदिराचे माझे सर्व कलाकार मित्र; श्री. जगन्नाथबुवा दळवी, श्री. मदनसिंग पवार, श्री. वसन्तराव खरे, श्री. प्रभाकर देशपांडे, श्री. बाळासाहेब बारहाते, कु. सरोज खरे, प्रा. सौ. मालतीबाई मादुस्कर, श्री. मनोहर लव्हेकर व कुमार आनंद असनारे; या सर्व कलावंतांनी 'गीत–गोविंद'च्या कार्यक्रमांत प्रत्यक्ष भाग घेऊन वेळोवेळीं आमचे कार्यक्रम साजरे केले याबद्दल मी सर्वांचा ऋणी आहे. माझे गुरुतुल्य स्नेही प्रा. मनोहर कासलीकर यांचे आभार कोणच्या शब्दांत मानावे हेंच मला कळत नाही! त्यांनी गीत–गोविंदांतील श्रीकृष्णाचीं गीतें गाण्याचें कबूल करून माझ्या ह्या स्वल्प कलाकृतींचा उद्धार केला! गुरुवर्य राजाभाऊ नवसाळकर व गुरुवर्य श्री. भैय्यासाहेब देशपांडे या उभयतांनी सहानुभूतिपूर्वक सूचना करून जें अमोल मार्गदर्शन केलें त्याबद्दल त्यांचे आभार मानणें अपरिहार्य आहे! गुरुतुल्य श्री. यशवन्तराव भट, पूज्य श्री. डॉ. सुमन्त, प्रा. दादासाहेब लोथे, गुरुवर्य बाबुराव कुन्हेकर व राजाभाऊ कुन्हेकर या सर्वांनी प्रोत्साहन देऊन माझा उत्साह नेहमीच द्विगुणित केला! त्यांचें सहकार्य शब्दातीत आहे!

श्री. द. भा. प्रधान, श्रीमन्त श्री. उत्तमराव शिंदे, श्री. नानासाहेब इंगोले, प्रा. दादासाहेब खांडेकर व तसेंच, श्रीमती सौ. भानुमतीबाई सिंह यांच्या सहकार्यावांचून 'गीत-गोविंद' पुस्तकाच्या रूपाने प्रसिद्ध होणें अशक्य होतें! ती कृतज्ञता कशी व्यक्त करूं?

माझ्या घडविणारांपैकी एक गुरुवर्य श्री. कृ. व्यं. पेशकार, प्राध्यापक, विदर्भ महाविद्यालय, अमरावती यांनी या पुस्तकाचा पुरस्कार करून मला व कलामंदिराला उपकृत केलें आहे! गुरुवर्य अण्णासाहेब व्यवहारे यांच्या प्रसादपूर्ण कवितांचें अध्ययन करूनच मी कविता करायला शिकलों! आजन्म त्यांच्या ऋणांत राहण्यांतच मला समाधान वाटेल! नभोवाणीच्या नागपूर, पुणें व मुंबई केंद्रांवरून हा कार्यक्रम ध्वनिक्षेपित करण्याची संधि दिल्याबद्दल श्री. सी. ग. लाड, श्री. रामभाऊ फाटक व कु. प्रभा अत्रे यांचा मी मनःपूर्वक आभारी आहे. 'गीत–गोविंदा'चें पुस्तक शक्य तितक्या आकर्षक स्वरूपांत वाचकांच्या हातीं देण्याचें यश सर्वस्वी श्री. बाळासाहेब ठाकूर, प्रमुख संचालक ठाकूर आणि कं. लि., अमरावती यांच्या अथक प्रयत्नांना व व्यवस्थापक श्री. कृष्णराव खोंड यांच्या प्रामाणिक परिश्रमांना आहे. अर्थात् मुद्रणालयांतील सर्व कामगारांच्या सहानुभूतिपूर्ण सहकार्यावांचून हें शक्य नव्हतें. ह्या पुस्तकाच्या रूपाने त्या सर्वांच्या परिश्रमाच्या स्मृति मी सतत मनीं वागवीन.

पुस्तक रसिकांसमोर प्रस्तुत करितांना मला जसा आनंद होतो आहे तशीच भीतीहि वाटते आहे! कविवर्य ग. दि. माडगूळकर यांचें अनुकरण करण्याचा मीं यथाशक्ति प्रयत्न केला आहे; पण तें अनुकरण आंधळेपणाचें मात्र नाही एवढें खरें! मीहि गीत–गोविंदांतील कृष्णाच्या बाललीला वर्णन करतांना हिंदीचे सुप्रसिद्ध कवि सूरदास व कृष्णायनकर्ते श्री. द्वारकाप्रसाद मिश्र यांच्या काव्याचा कांही ठिकाणीं आधार घेतला आहे. मला संस्कृत येत नाही. पूज्य श्री. बापूसाहेब गोखले व माझे काका श्री. बाळकृष्ण कवीश्वर या दोघांनी मला अर्ध्या–अर्ध्या तासांतच भगवद्गीतेचा सार समजावून सांगितला आणि त्याच रात्रीं मीं 'गीता–गीत' रचलें! गीत–गोविंदाच्या गीतरचनेंत शक्य तितकी विविधता आणण्याचा मीं प्रयत्न केला आहे. मराठी भाषिक रसिक ह्या ग्रंथाचें स्वागत करतील अशी आशा आहे.

दि. १।९।१९६१ }
गोकुळ–अष्टमी }

**मनोहर केशव कवीश्वर,**
अमरावती.

## मधुसूदन कलामंदिर
## अमरावती

अध्यक्ष:--श्री. कृष्णराव उर्फ बाबासाहेब मोघे,

★ संयोजक ★

| संगीत विभाग : | चित्र विभाग : | प्रकाशन विभाग : |
|---|---|---|
| मधुकर गौतम | निशिकान्त वोडे | प्र. श्री. धांडे |

संचालक:--श्री. केशवबुवा कवीश्वर

## क्रमणिका

* * * * *

( दि. ५ नोव्हेंबर १९६० रोजीं वनितासमाज, अमरावती येथे 'गीत गोविन्दा 'चा पहिला जाहीर कार्यक्रम झाला. त्या प्रसंगीं खालील कलाकारांनी त्यांत भाग घेतला होता. )


| | | पृ. |
|---|---|---|
| १. गडगडलें आभाळ | ● श्री. मनोहर कवीश्वर, श्री. मधुकर वानखडे, कु. पुष्पा कुऱ्हेकर, कु. जयश्री खांडेकर | १ |
| २. ऊठ मुकुन्दा | ● कु. सरोज खरे, श्री. वसन्तराव खरे, श्री. गजानन बारहाते | ४ |
| ३. गोकुलचा लाज्या | ● कुमार राजेश खांडेकर | ६ |
| ४. तुझा सावळा हरि ! | ● कु. कुमुद हिरूरकर, कु. विभावरी प्रधान, कु. शीला वाटाणे, कु. पुष्पा कुऱ्हेकर. | ९ |
| ५. कृष्णमुरारी | ● श्री. मनोहर कवीश्वर, श्री. वसंतराव खरे, कु. जयश्री खांडेकर, कु. सरोज खरे | १३ |
| ६. आभाळाने वैर मांडिलें ! | ● कु. जयश्री खांडेकर, कु. पुष्पा कुऱ्हेकर, श्री. मनोहर कवीश्वर | १५ |
| ७. नृत्याभास | ● श्री. मनोहर कवीश्वर, श्री. निशिकांत बोडे, श्री. मदनसिंह पवार, श्री. जगन्नाथबुवा दळवी, श्री. मनोहर कोळेश्वर | १८ |
| ८. जाई घनश्यामा | ● कु. कुमुद हिरूरकर | २१ |
| ९. चाललों गे माउली | ● कु. पुष्पा कुऱ्हेकर | २३ |

| | | |
|---|---|---|
| १०. गोपीविरह | ● कु. सरोज खरे, कु. उषा कुऱ्हेकर, कु. जयश्री खांडेकर, कु. शीला वाटाणे. | २५ |
| ११. संपला कृष्णावरचा रोष | ● श्री. मधुकर वानखडे | ३० |
| १२. थांब सारथ्या ! | ● कु. पुष्पा कुऱ्हेकर | ३४ |
| १३. अंबेच्या मंदिरीं- | ● कु. कुमुद हिरूरकर | ३८ |
| १४. मी स्वामी पतितांचा | ● प्रा. मनोहर कासलीकर | ४० |
| १५. चिंधी | ● श्री. प्रभाकर देशपांडे, कु. उषा कुऱ्हेकर, प्रा. मनोहर कासलीकर, कु. पुष्पा कुऱ्हेकर | ४२ |
| १६. रे ! सुदामा, बैस या सिंहासनीं ! | ● प्रा. मनोहर कासलीकर | ४६ |
| १७. सुवर्णतुला | ● श्री. मनोहर कवीश्वर, प्रा. मनोहर कासलीकर, कु. कुमुद हिरूरकर, कु. पुष्पा कुऱ्हेकर | ४९ |
| १८. धर्मयुद्ध माजलें ! | ● श्री. वसन्तराव खरे | ५७ |
| १९. कर्तव्याने घडतो माणुस- | ● प्रा. मनोहर कासलीकर | ६१ |

●●●

बांसरी-वादक



श्री. मनोहर कोळेश्वर



सूत्रधार : श्री. मनोहर कासलीकर

निवेदिका



सौ. इंदुताई खांडेकर

# आमचे कलावन्त

क्लॉरोनेट-वादक



श्री. फकीरमहंमद

दिलरुबा



श्री. मधुकर गौतम

★

तबला-वादक



श्री. मदनसिंह पवार



कुमार असनारे



श्री. जगन्नाथबुवा दळवी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 32036 वि. ...
क्रमांक 1451 नों. दि. 2/2/62



## गडगडलें आभाळ ....१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
११९८९

गायक : श्री. मनोहर कवीश्वर

● ● ● द्वापारयुगांत यमुनेच्या कांठीं मथुरेचें संपन्न गणराज्य होतें. त्या गणराज्याचा राजा कंस हा अत्यंत अन्यायी होता. त्याने अनेक लहानमोठ्या राजांना तुरुंगांत डांबून ठेविलें होतें. 'वसुदेव' नांवाच्या आपल्या मित्रतुल्य सामन्ताशीं, त्याने आपली प्रिय भगिनी देवकी हिचा विवाह स्वप्रयत्नांनी घडवून आणला. पण...

...पण व्यक्तिमागे सावली तसें कर्मापाठीं फळ अखण्ड धावत असतें! विवाहाची वरात कंस स्वतःच्या रथांतून मिरवीत असतां, एकाएकी आकाशवाणी झाली. कंसाच्या करणीचा प्रतिसाद तींत उमटला— "याच देवकीचा आठवा पुत्र तुझा वध करील." आणि निरपराध देवकी–वसुदेवांना मथुरेच्या बंदीगृहांत आपला संसार थाटावा लागला. जिवाचें नांव दगड ठेवून तिला कंसाकरवीं सात वेळां आपल्या नवजात, अजाण अर्भकांच्या शिळेवर चिंधड्या झाल्याचें पहावें लागलें आणि आठव्या पुत्राचे वेळीं मात्र नऊ मास पूर्ण होण्यापूर्वीच, श्रावणांतल्या एका काळ्या रात्रीं ● ● ●




निवेदक:---

गडगडलें आभाळ नौबती मेघांच्या झडती
पापांचे तव डंके कंसा गर्जन रे करिती ॥ धृ ॥

सहस्त्रराजे कारावासीं दुष्टा तूं डांबले
राज्य घेउनी वृद्ध पित्याला शृंखलेंत बांधिलें
सौभाग्यासह निज भगिनीला दुर्भागीं जखडिलें
त्या दीनांचे शापित अश्रू जलधारा पडती ॥ १ ॥

धर्म आंधळा-नीति लंगडी न्याय जिथे बहिरा
ऐसा नृपती भाळीं लेवुन तळमळली मथुरा
दीन प्रजेची आर्त हांक ही ऐका परमेशा
"उद्धारा सर्वेशा"
वृद्ध पित्याचा करुण धावा ऐका जगदीशा
"मुक्ती देइ रमेशा"
ममतेला मुकलेली सधवा टाहो फोडित ताता
"तार अम्हां भगवंता"
त्रस्त होउनी आक्रंदन ही करिते धरती माता
"सोडव रे बलवन्ता"

कृष्णजन्म.




" तेजस्वी हा बालक माझा याला तरि जगवा ! "

आर्त स्वरांनी पाझरले मग कारागृहि पाषाण
श्रावणमासीं काळ्या रात्रीं प्रगटे श्रीभगवान

" परित्राणाय साधूनाम् विनाशाय च दुष्कृताम्
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगेयुगे "

तृप्तीने आकंठ भरावा ऊर देवकीने
कंसाचा परि आठव होता वदली दुःखाने
" तेजस्वी हा बालक माझा याला तरि जगवा
वत्सलतेचा वांझपणा हा नकोच पतिदेवा "
वसुदेवाने निश्चय केला पणास लावुन भक्ती ॥ २ ॥

क्षणांत तुटला खळ्कन् अडसर उघडे कारागार
गर्वमदाने झिंगुन पडले प्रहरी सोडुन द्वार
अष्टमिच्या त्या रात्रीं भरला पापांचा अंधार
रोधावे कुणि वसुदेवाला प्रभु असतां संगतीं? ॥ ३ ॥

नव्हे गर्जना मेघांची—हा जनतेचा अभिशाप !
नव्हे वीज ही—दुष्टा, तुझिया मातेचा संताप !
वादळ कसलें ? तुझीच करणी ठरली झंझावात !
डोळ्यांदेखत जिच्या चिरडली ममता जननीची
त्या आईचा गहिवर आला यमुनेंतुन भरती ॥ ४ ॥



## ऊठ मुकुंदा ....२

*गायक : श्री प्रभाकर देशपांडे*

● ● ● मातेच्या गहिवराने भरून आलेल्या यमुनेंतून कंसाचें दुर्दैव वसुदेवाने सुरक्षितपणें गोकुळांत नंदगृहीं पोहोचविलें, आणि यशोदेच्या नवजात कन्येला घेऊन तो परतला. इकडे गोकुळांत 'यशोदेला पुत्र झाला' हें ऐकून सारें गोकुळ हर्षानें नाचूंगाऊं लागलें. गोकुळच्या गौळणींनी श्यामवर्णास अनुरूप "कृष्ण" असें बाळाचें नांव ठेवलें. बाळकृष्णाच्या अलौकिक रूपमोहिनीने गोकुळवासी इतके मुग्ध झाले की प्रतिदिन प्रभातीं, त्या बाळकृष्णाला जागविण्यासाठी, गोपगोपींच्या मनोवाणींतून, गोकुळांत घरोघर भूपाळ्या ऐकूं येऊं लागल्या. ● ● ●



# ऊठ मुकुंदा-

गोकुळवासी:--

ऊठ मुकुंदा रे घननीळा रवि उदया आला !
पहा झळकती उंच गोपुरें सखया गोपाला ! ।। धृ. ।।

पद्मलोचना ! सरीं विकसला मेळा कमळांचा !
झुरुमुरु झुरुमुरु क्षिरपात्रीं रव येई धारांचा !!

तुझ्या दर्शना आतुर वत्सा धेनु हंबरती !
चिमणे पक्षी चिवचिवती अन् तुजला जागविती !!
अनुकारावें विशालतेंतून गगनाने तुजला ! ।। १ ।।





## ऊठ मुकुंदा ....२

*गायक : श्री प्रभाकर देशपांडे*

●●● मातेच्या गहिवराने भरून आलेल्या यमुनेंतून कंसाचें दुर्दैव वसुदेवाने सुरक्षितपणें गोकुळांत नंदगृहीं पोहोचविलें, आणि यशोदेच्या नवजात कन्येला घेऊन तो परतला. इकडे गोकुळांत 'यशोदेला पुत्र झाला' हें ऐकून सारें गोकुळ हर्षानें नाचूंगाऊं लागलें. गोकुळच्या गौळणींनी श्यामवर्णास अनुरूप "कृष्ण" असें बाळाचें नांव ठेवलें. बाळकृष्णाच्या अलौकिक रूपमोहिनीने गोकुळवासी इतके मुग्ध झाले की प्रतिदिन प्रभातीं, त्या बाळकृष्णाला जागविण्यासाठी, गोपगोपींच्या मनोवाणींतून, गोकुळांत घरोघर भूपाळ्या ऐकूं येऊं लागल्या. ●●●



# ऊठ मुकुंदा-

गोकुळवासी:--

ऊठ मुकुंदा रे घननीळा रवि उदया आला !
पहा झळकती उंच गोपुरें सखया गोपाला ! ॥ धृ. ॥

पद्मलोचना ! सरीं विकसला मेळा कमळांचा !
झुरमुर झुरमुर क्षिरपात्रीं रव येई धारांचा ! !

तुझ्या दर्शना आतुर वत्सा धेनु हंबरती !
चिमणे पक्षी चिवचिवती अन् तुजला जागविती ! !
अनुकारावें विशालतेंतून गगनाने तुजला ! ॥ १ ॥





## गोकुलच्या लाजा ....३

*गायक : कुमार राजेश खांडेकर*

● ● ● यशोदेचा सांवळा कृष्ण बोबडे बोल बोलून यशोदेला आपल्या मातृत्वाची सार्थकता पटवीत होता. त्याचे सवंगडी मित्र, तेहि बोबडेच बोल बोलत. बलराम या सर्वांत मोठा. तो गाई घेऊन वनांत जात असे. एके दिवशीं बलरामदादाच्या मागे लागून बालकृष्ण वनांत गेला. तेथे त्याचे इतर सवंगडी त्याच्या काळेपणाबद्दल चिडवूं लागले. वयाने मोठा पण वाणीने बोबडा पेंद्या कृष्णाला रडकुंडीस आणण्यासाठी मित्रांना म्हणाला. ● ● ●




पेंद्या:-

बललाम बघा हो गोला, क्लिश्ना तूं कां ले काला?
माय यशोदा गोली शुंदल, नंद गोपहि गोला
त्यांच्या घलांत तूंच कश्या ले एकच झाला काला ?
छोबत ना बललाम तुला ले भाऊ अशला कशला ?
कोंदा देउनि विकत घेतला मला वातते याला !

खेलुं नको ले कालया जा, खेलुं नको !
खेलुं नको ले अमुच्या शंगे तोंद तुझें ले काले
बोलुं नको ले कालया जा, बोलुं नको !
बोलुं नको ले अमुच्या शंगे तोंद तुझें ले काले

अले, अले ! हा ललतो आहे; खलंच कशा हा खुला !
उगी उगी ले क्लिश्ना कलुं या धुवून तुजला गोला !

माईला मी शांगिन आनिक दुधांत तुजला न्हाऊं
होऊं दे मग दूधहि कालें कितीक होइल पाहूं ?

ललूं नको ले ! ललूं नको ! दोले घे पुशुनी !
'आई--आई' उगाच कलिशी कशाश कुंजवनी ?

वा ले वा ! अले वा ले वा ! अजून ललतो कां ले !
मागे लागुन बललामाच्या आला वनाश कां ले ?

ललूं नको ले किलश्न कन्हैय्या बघ तो वानल बघ तो मोल !
बघ ती वाहे कशी अपुली यमुना नदी शमोल

घे ले घे ले काथी माझी, घे ले पावा माझ्या
पुश पुश डोले, हंश हंश आतां गोकुलच्या लाजा

**सवंगडी:–** गोकुळच्या राजा ?

**पेंद्या:–**

हो हो ! गोकुलच्या लाजा !
कलुं या तुलाच अमुच्या लाजा !

अशुं द्या काला ! हा तल आम्हां गवल्यांच्या लाजा
माझी भाकल खातो का गोकुलच्या लाजा ?
लोनी तुजला देऊं का ले गोपांच्या लाजा ?

लोनी भाकल खाऊन आपन लाजा भवतीं फेल धरूं !
'काला–गोला' भांदन अपुलें खेलुन शाले भुलूं
'लहान–मोथा' भांदन अपुलें खेलुन शाले भुलूं !
आपन खेलुन शाले भुलूं ! आपन खेलुन शाले भुलूं ॥

**निवेदक:–** ● ● ●

हंसला कृष्ण कन्हैय्या आणिक रमला कुंजवनीं
मुरलीच्या नादांत हरपला अनंत गोपजनीं ॥





## तुझा सांवळा हरी ....४

*गायिका : कु. विभावरी प्रधान*
व इतर

● ● ● शैशव सोडून बालकावस्थेंत प्रवेश करणारा कृष्ण जगावेगळे हट्ट करून यशोदामाईस हैराण करीत असतांना-सुद्धा तिने मायेची पांखर घालून चिमण्या कृष्णाचें कोडकौतुक करावें. थोडा मोठा झाल्यावर तर नंदाचें घरच काय पण सारें गोकुळ त्याच्या खोड्यांना उणें पडावें. प्रत्येक दिवशीं कितीतरी गौळणी यशोदामाईजवळ कन्हैय्याचें गाऱ्हाणें सांगायला यायच्या. एके दिवशीं सकाळीं अशाच तीन गौळणी रागाने धुसफुसत आल्या अन् यशोदामाईस हांक मारून म्हणूं लागल्या, ● ● ●




## ( संगीतिका )

आंवर माई बाळ गुणाचा तुझा सांवळा हरी
लाल लाडका असुं द्या तुमचा ठेवा अपुल्या घरीं ।। धृ ।।

**यशोदा :–**

सांगा मजला एकेकीने कृष्णाचे अपराध
समक्ष तुमच्या शिक्षा करितें मोजुन सर्व प्रमाद
ओटीवरती बसा नि सांगा, कृष्णपिता ना घरीं ।। १ ।।

**गोपी १ ली :–**

भल्या पहांटे आज सखे मी झोपेंतच होतें
दूध–दोहनी सासू आणिक हेहि होते तेथे
मुखास लोणी माखुन माझ्या, दाखवि सासूला
तोंड सुटे मग त्या वृद्धेचें 'चोर' म्हणाली मला
ते माराया धावुन येतां हंसला शिक्यावरी ।। २ ।।

**यशोदा :–**

कोण तिथे गे होते शिक्यावरी ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 32034 वि. ७।५
क्रमांक 9449 नों. दि. 2452

सर्व गोपी:-

माई, तुझा सांवळा हरी · · · ॥

गोपी २ री:-

माहेरीं मी परवां, सखये, विश्रांतीस्तव आलें
आई होती काढित लोणी, दादा वनास गेले
आज सकाळीं हळूंच येउन वेणिस बांधुन दोरी
टांगे खुंटीला अन् उठवी तोंडीं लावून चरवी
माराया मी धसकन् उठतां-हंसला तुमच्यापरी !!

यशोदा:-

काय सांवळा हरी ?

सर्व गोपी:-

हो, हो, तुझा सांवळा हरी ॥

गोपी ३ री:-

केव्हा नेलें कुणास ठाउक उठवुन माझ्या लेका
आणि घराच्या मागे लपवुन आला मारित हांका
"यमुनेच्या पाण्यांत बुडे तव बाळ, जाइ धावुनि" !
सासू अन् मी धावत गेलों घर उघडें टाकुनी,
परतुन येतां दोघे दिसले भक्षक लोण्यावरी !

यशोदा-

काय तिथेहि होता कृष्णपरी ?

सर्व गोपी-

माऊली ! तुझा गुणी श्रीहरी ॥

यशोदा–

पण ही सांगी सगळी तुमची आहे ना गे खरी ?

गोपी–

हो हो खरी, ग, अगदी खरी !

यशोदा–

सांगा पाहूं कोण पहुडलें इथे मंचकावरी ?

गोपी–

काय सांवळा हरी ?

यशोदा–

प्रावरणातें बघा काढुनी झोपे मम सोनुला !
इवले डोळे चोळित उठला, माझा गे तान्हुला !!





## कृष्णमुरारी ....५

गायिका : कु. उषा कुन्हेकर
व इतर

● ● ● अखेर या कागाळयांना कंटाळून यशोदेने कृष्णाला बलरामासह गाई चारण्यासाठी मधुवनांत पाठविण्याचें ठरविलें आणि बालकृष्ण आता... " गोपालकृष्ण " झाला. घोंगडी, काठी आणि पावा घेऊन सवंगड्यांसह गाईंमागे त्याने वनांत जावें,...यमुनेच्या पाण्यांत आकंठ डुंबावें,... अन्...मुरलीच्या मधुमधुर नादाने मुक्या मधुवनास बोलकें करावें,...पशुपक्ष्यांस मुग्ध करावें,.. अन मग कृष्णरूप झालेल्या बालगोपालांच्या सजीव सृष्टीबरोबर अबोल वन-देवतांच्या अचेतन सृष्टीने 'वसंत-बहार' व्हावें.... ● ● ●



# कृष्णमुरारी

कृष्ण मुरारी हो कृष्ण मुरारी ।
यमुनेच्या कांठावरी खेळत होरी ॥ ध. ॥

मुरलीच्या नादें ब्रह्मांड कोंदें !
हांसलें ! नाचलें ! विश्व फुलविलें !
पक्षि रंगले ! हो तरू डोलले !
जळीं यमुनेच्या नर्तन चाले !
कुंजवनीं गोपगणीं रंगला हरी ॥ १ ॥

मुरलीच्या श्वासांतुन सृष्टिचा 'बहार'
हा 'वसंत' मानुनिया उमलला उभार
कृष्णवदन सांवळें कमल भासलें निळें
गुं गुं गुं गुं गुंजारव मधुकरही करिति खुळे
जडचेतन सृष्टि सर्व कृष्णरूप जाहली
नादब्रह्म होउनिया उरली मुरली
मुखकंद सानंद गोविन्द गाती ॥ २ ॥
( गोविन्द गोविन्द गोविन्द गोपाल )



## आभाळाने वैर मांडिलें ....६

*गायिका : कु. जयश्री खांडेकर*
*व इतर*

● ● ● कृष्णाच्या मधुमुरलीने कुंजवन बहरून येई. बालवयांत बलाढ्य राक्षसांना ठार मारण्याच्या अगम्य लीलांनी गोपगोपिकांच्या मनीं कृष्णप्रीतीचे फुलोर फुलावेत. पण गोकुळींच्या या सुखसामर्थ्याचा ब्रह्मइंद्रादि देवांना मत्सर वाटूं लागला ! सर्वज्ञ वासुदेवास याची जाणीव होतांच त्याने गोकुळांतील इंद्रपूजेची प्रथा मोडून गोकुळांवर वात्सल्याची छाया करणाऱ्या गोवर्धनाची गोपाळांकरवी ईश्वर म्हणून पूजा करविली.

अशा तऱ्हेने पूजेचा मान गो–वर्धन करणाऱ्या गोवर्धनास मिळतांच स्वर्गांत सुरेंद्र संतप्त झाला ! विकाराच्या प्रक्षोभाने, देव असला तरी त्याचा दैत्य होतो ! वज्रधर इंद्राने वरुणाला अतिवृष्टीने गोकुळच्या गोपालांना त्रस्त करण्यासाठी आज्ञा केली आणि जणुंकांही आकाशाचें आणि धरणीचें वैर असल्यासारखें, प्रलयगर्जना करीत काळेकुट्ट मेघ क्षितिजाशीं जाऊन भिडूं लागले. ● ● ●




आभाळाने वैर मांडिलें धरणीमातेशीं
प्रलय गर्जना करीत भिडलें मेघ क्षितीजाशी ॥ धृ. ॥

राक्षस वारा वादळ होऊन गद्‌गद् हलवी भव्य तरु
हताश होऊन पतितप्रवाहीं तेंहि लागलें त्यांत तरूं
अभिमानाचे महाल खचले शिल्प लागलें त्यांत विरूं

गोपाळांचें विश्व बुडालें प्राण दाटलें कंठाशीं ।
प्रलय गर्जना· · · ॥ १ ॥

किती पांखरें घरट्यावांचुन जलधारांतुन भिरभिरती
किती वांसरें वाहुन जातां हताश होऊन हंबरती
गोपगोपिका बुडतां बुडतां कृष्णसख्याला आळविती

धरतीच्या पाडसा, पावसा, रोध सर्वनाशी ।
प्रलय गर्जना· · · ॥ २ ॥

कृष्ण-प्रभूने गोवर्धनगिरि करांगुलीवर ठेवियला
त्या श्रद्धेच्या छत्राखालीं ठेवि सुरक्षित गोपकुला
परंतु वदला, "क्षमा करा मम करांगुलींतून येत कळा

अवघ्या कांठ्या भिडवुन तुमच्या
कणकण शक्ती द्या मजसी ।"
प्रलय गर्जना · · · ॥ ३ ॥

अखेर विरला मद इंद्राचा कृष्णपदीं नमला
गोजिरवाण्या मुखें सावळ्या, यत्नवेद फुलला
"ऐक्यबलानं अजिंक्य ठरतो मानव देवाला
धरणीवरती करणीने निज झुकविल स्वर्गाला ।"





# यमुनेच्या तटीं ....७

*गायक : श्री. निशिकान्त बोडे*

● ● ● अशा तऱ्हेने कृष्णाने गोकुळांत नवचैतन्य निर्माण केलें. स्वसामर्थ्याने गोकुळ निर्भय केलें. साऱ्या गोकुळवासीयांना पूर्वीच्या खोडकर कृष्णाचा आता लळा लागला होता. पण गोपींना मात्र वेड होतें त्याच्या मुरलीचें! यमुनेच्या पाण्याच्या निमित्तानें कुंजवनांत यावें, मधुसूदनाच्या मधुवंशीच्या स्वरामृताने हृदयाचे घट भरभरुन आकंठ पान करावें, मुरलीच्या स्वरसंवादांतून जिवाशिवाचा संवाद सुरु व्हावा. .

त्या पाहा! गौळणी कुंभ घेऊन यमुनेच्या पाण्याला निघाल्या! पायीं नूपुरांचा मंजुळ झंकार करीत, करीं कंकणांची कोमल किण्किण् करीत, मनीं मुकुंदाच्या मीलनाची अतृप्त मनीषा घेऊन मधुवनीच्या केदारांत मनीचा मध्यम शुद्ध झाला. ● ● ●

## यमुनेच्या तटीं--



इतुक्यांत श्रवणिं ये मधुमुरलीचा मंजुळ मंदध्वनि . . . !




## ( नृत्याभास )

यमुनेच्या तटिं घेउनिया कटिं गौळणि आल्या
कुंभ भराया जलें
रुणझुणु रुणझुणु पायीं पैंजण मंजुळ झंकारले
ता थै थै तत् ऽ थै थै तत् द्रग थै तत ता ३
ठुमकत ठुमकत चालत उमटत धुमकिट धुमकिट
धाक्डान् धाकत् धा
रोमांचाने गुलाब झाला पुलकित यमुना घाट
नवतीच्या युवतींच्या पायीं शहारली मग पाऊलवाट
तुडुम्ब भरुनी घागरि घेऊन परत्या होती गजगामिनी
इतुक्यांत श्रवणिं ये मधुमुरलीचा मंजुळ मंदध्वनि
तान ऐकुनि भान हरपलें ! नयन विसरले परती वाट !
अंतरघट मग स्वरामृताने भरले कांठोकांठ !
सुगंध झाला कणकण तनुचा दृष्टि मनाची थटे—
श्रवणीं भरलें मादक संगित वंशीधर ना दिसे कुठे
आतुरल्या नेत्रांनी शोधला
भिरभिरत्या नेत्रांनी शोधला
कुठे कृष्ण गोपाल ?

छननननन छूम छूम नूपुर पदिं कंकण करिं
नादलें किणकिणले देखण्यास नंदलाल ।
मुरलि–अधर–धर गिरिधर नटवर
लपतछपत ये वृक्षाआडुन
गोपी जाता घागर घेउन
तोंच फेकुनी खडा–
फोडिला घडा–
भिजविल्या गोपी प्रमजलें
क्षण थरथरल्या, मनिं बावरल्या,
किंचित् हंसऱ्या गालीं रुसल्या ।
क्षणांत नयनीं राग दिसे,
तर क्षणांतरीं अनुराग वसे
भालीं जल–नक्षत्र फुलें
मुरलिमनोहर कृष्णकन्हैया श्याम सांवळा दिसे
मोरमुकुट शिरिं, कानीं कुंडल, पीताम्बर विलसे
क्षणभर रुसवे, फुगवे क्षणभर,
क्षणभर भांडण, क्षणीं अबोले
नेत्र मिळाले-हात मिसळले-अंतरंग श्रीरंगि रंगले
नूपुर कंकण अबोल झाली– !
वाचाळांची वाणी विरली !
जिवाशिवाच्या संवादांतुन संवादे मग केवळ मुरली
मुक्त वायु मधुवनिचा मादक मंदमंद मन धुंद करी ।
गोपीजन-मन मोहन होउन 'कृष्ण-कृष्ण' जयघोष उरीं ।।



अनुक्रम ... दि. ...
क्रमांक ... नों. दि. ...



# जाई घनश्यामा ....८

गायिका : कु. कुमुद हिरूरकर

●●● स्वर्गांतून ही सुरम्य कृष्णलीला पाहणाऱ्या नारद-मुनींना स्वस्थ बसविलें नाही. गोकुळचे सुरेल सुख त्यांच्या नेत्रीं खुपलें,...मनीं दुखलें ! त्यांनी तडक मथुरेंत येऊन कंसाच्या कानीं कृष्णजन्म–रहस्याची ठिणगी टाकली ! मनोमनीं सूडाच्या ईर्षेने पेटलेल्या कंसाने कृष्णाच्या वधासाठी अनेक प्रयत्न केले. पूतना राक्षसीकडून कृष्णाला विषपान करविलें, मधु-मुरादि बलाढ्य राक्षस पाठविले; पण पूर्णावतार कृष्णचंद्राने कंसाच्या प्रयत्नास सफल होऊं दिलें नाही. मग मात्र कंसाने राजकारणांतील मुत्सद्दीपणा पणास लावला.

आपला मंत्री अक्रुर यास त्याने आज्ञा केली, " नंद-यशोदेस सांग, आपल्या भाच्यांना भेटण्यास कंसमामा आतुर झाले आहेत. जा, बलराम–कृष्णाला लगोलग रथांत घालून घेऊन ये." राजाज्ञेप्रमाणे अक्रुराने ममताळू नंदयशोदेस कृष्णजन्माचें रहस्य सांगितलें.

यशोदा माऊलीचें दुःख ! त्या दुःखास उपमा द्यावी कुणी, अन् कशाची ! अखेर तिने शोक आवरला. देवकीच्या पुत्रविरहाचे क्लेश तिच्या मनींमानसीं सजीव झाले आणि पंचप्राणांची कासावीस गिळीत, अश्रूभरल्या डोळ्यांना पदर लावीत, करपल्या मातृवात्सल्याच्या गहिवराने ती सागरचित्ता यशोदेवी म्हणाली ●●●

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.



# जाई घनश्यामा

ममतेचें पुर गोकुळ सोडुन जाई घनश्यामा
कर्तव्याची मथुरा तिष्ठत राहे अभिरामा ॥ धृ. ॥
अष्टमास तूं वसला कृष्णा देवकिच्या उदरीं
त्या आईचे क्लेश हराया जाई रे श्रीहरी
मुक्तिस्तव मथुरेची जनता स्मरते तव नामा ॥ १ ॥
माझा मानुन तुला कन्हैया ऊर भरुन पाजिलें
माझा मानुन, निर्दयतेने तुला असें ताडिलें
नको धरूं रे रोष कशाचा दुखवूं मातृप्रेमा ॥ २ ॥
देवकिला मम निरोप द्यावा अक्रुरजी सांगोनी
रोज सकाळीं मम कृष्णाला लागे भाकरलोणी
उणावलें जर येथे कांही क्षमा करा आम्हा ॥ ३ ॥
न्या अक्रुरजी पण सांभाळा
गोकुळचा हा जीवजिव्हाळा
सदा यशोदा श्रीकृष्णा तव पूर्ण करिल कामा ॥ ४ ॥





## चाललों गे माऊली ....९

गायिका : कु. पुष्पा कुऱ्हेकर

● ● ● पूर्णावतार कृष्णाला हें रहस्य ठाऊक होतें ! पण माई यशोदेला सोडून जातांना तो सर्वज्ञ जगदीश्वर यमुनेच्या प्रवाहासारखा कितीतरी वेळपर्यंत दोन्ही डोळ्यांतून पाझरत राहिला ! अखेर नंदगोपांस कृतज्ञतापूर्वक प्रणाम करून तो आईचा निरोप घेण्यास गेला. आईला सोडून जातांना तो निर्विकार निर्गुण परमेश्वर बाळाहून बाळ होऊन गहिंवरल्या कंठाने म्हणाला.... ● ● ●




चाललों गे माउली मी सोडुनी तव साउली
मानितों आज्ञा तुझी–पण वाट टोंचे पाउलीं ॥ धृ. ॥

देवकीच्या अंकुराला तूंच माते फुलविलें
देवकीने देह दिधला, तूंच पण गे जगविलें
देवकीने रडविलें, अंगाई तूं मज गायिली ॥ १ ॥

रांगलों गेहीं तुझ्या गे, प्राशिली ममता तुझी
पाउलांनी चाललों तव, बोललों वाणी तुझी
नवनितापरि स्पर्श होतां झोप नेत्रीं दाटली ॥ २ ॥

पूस माई लोचना गे, कृष्ण करितो वन्दना
अंतरींच्या वाणिने दे आशिषा संजीवना
धेनु वत्सा लोभवी कृष्णार्त ती जर जाहली ॥ ३ ॥



## गोपीविरह ....१०

गायक : कु. जयश्री खांडेकर

●●● कृष्णाचा रथ अदृश्य होईपर्यंत, अनिमिष नेत्रांनी पाहात सारें गोकुळ, कुंजवन होऊन, यमुनेच्या कांठीं उभें होतें ! गोकुळांतून कृष्ण गेला पण कित्येक महिने गोकुळवासी कृष्णविरहाचें दुःख विसरूं शकले नाहीत. कृष्णाशीं भांडणाऱ्या गोपी तर कृष्णविरहानें वेडावून गेल्या होत्या ! आता त्या साऱ्याजणी कृष्णाची एकएक आठवण काढून आपल्या दुःखास वाट देत होत्या. ●●●

# गोपी-विरह



(१) अनुराधा नांवाच्या गोपिकेस आठवलं– ती आपल्या सखीस सांगूं लागली, "व्रजवनांत दही विकण्यासाठी म्हणून मी निघालें अन् वाटेंत अचानक कृष्ण भेटला–"

* मज रोखत श्याम कन्हैया ।
वाट अडवुनी मागत लोणी ।
सतत छळत मजला ॥ १ ॥

(२) अनुराधेची सखी-यशोमति हिनेहि आपल्या मनाची अवस्था सांगून टाकली. ती अनुराधेला म्हणाली, "कशाला त्या दिवशीं मी यमुनेच्या पाण्याला गेलें ! गेलें नसतें तर ह्या सावळ्यानें माझं मन असं मोहून टाकलं नसतं, अन् मला हें असह्य दुःख ह्या वेळीं सहन करावं लागलं नसतं. खरंच ! उगाच गेलें मी यमुनेच्या पाण्याला. . ."

* मी जाउन यमुना तीरीं
देखियला सखि श्याम श्रीहरी
मोहन रूप सुरम्य उरीं ॥ धृ. ॥

मम मनिं वसे श्यामल मूर्ती
'वेडी' मज जन वदती
प्रकट करूं निज प्रीत कशी रे
लागे ओढ जिवास हरी ॥ १ ॥

(३) अनुराधा अन् यशोमतीचा संवाद देवांगनेने ऐकला अन् तिच्याहि विरहास वाचा फुटली ! ती म्हणाली, "मी किनई, दही दूध विकून परत येत होतें मथुरेहून... गांवांत शिरतां शिरतां, कुठून कुणास ठाऊक, मी त्या वनमाळीस दिसलें ! तो धीट पुढं आला अन् पुरजनांसमोर त्यानं धरला माझा हात ! मी गयावया करूं लागलें, रे वनमाळी, सोड माझा हात, सोड माझा हात, सोड ना माझा हात–"

दे वनमाळी रे देई रे
पुरजन देखुनिया बघ हंसती
दधि कुंभा मम दे रे..... ।

(४) तशीच चंद्रावली गोपिका तर अगदीच कृष्णवेडी होऊन गेली होती. तिला आकाशांतल्या मेघांच्या निळाईंत घनश्याम दिसला. पावसाचे चार थेंब तिच्या अंगावर पडले तर तिला वाटावें, आकाशांतील श्याम सावळा विरहार्त होऊन अश्रू ढाळतो आहे ! तिला एक दिवस भास झाला, कृष्णाने तिला 'मधुवनांत भेट' म्हणून सांगितलें. ही वेडी सरळ जाऊन बसली कुंजवनांत... तिच्या आंसावलेल्या नेत्रांनी तिने कृष्णाची वाट पाहिली... पण, घनश्याम आला नाही. ती म्हणते—

* घनश्याम नसे आला
नभीं आले मेघ कां ॥

वेडी मी शोधतें वनीं
जाळी विरहार्त जीव कां
नाही येत श्याम कां ?

(५) गोकुळांतल्या अनेक गोपींनी कृष्णाला विविध दृष्टींनी पाहिलें होतें. मधुराभक्तीच्या भावनेने कृष्णभेटीसाठी आतुर झालेल्या चारुलतेला तर कृष्णाच्या रूपमोहिनीने इतकें भारून टाकलें होतें की, तिला अहोरात्र कृष्णाच्या मदनरूपावांचून चैन पडेना. ती म्हणते--

* रुप तव मोहे रे अनुला
तुजला पाहुन रे गोपाला
कोटि मदन छळती सखया तनुला . . . ॥ धृ. ॥

कुंडल हलति डुलति श्रवणि तुझ्या
वंशी वदते गीत मधुमया
छनन छनन छूम छननन नूपुर
नादीं मधुतर मोही रे मजला . . . ॥ १ ॥

(६) कृष्णवेडी राधा तर सर्वश्रुतच आहे ! कृष्णापेक्षाहि त्याच्या मुरलीच्या स्वराने ती वेडावून जात असे. दिवसां, रात्रीं, जागेपणीं . . . स्वप्नीं . . . तिला दुरून कुठून तरी मुरलीचे स्वर ऐकू येत ! तिला वाटे, "श्यामसुंदर आपणास बोलावित आहे ! . . . अन् मग, . . . मोहनिद्रेंतील व्यक्तीप्रमाणे, ती झोपेंतल्या स्वप्नांत, मुरलीच्या स्वरांचा रोख घेत, चालू लागे ! . . . पण, पायांतील नूपुरांची वाचाळता तिला भीति घालीत होती, "सासू, नणंद जाग्या होतील ! . . ." तिला त्या नूपुरांचा राग आला ! ती पुनः मुरलीच्या दिशेने चालू लागली . . . मुरलीच्या स्वरसंजीवनीने तिचें तन-मन मोहरून

गेलें होतें... नेत्रांना कृष्ण दिसेना... म्हणून ते विरहार्त होऊन कृष्णाला शोधत होते... पण कानांत मधुमुरलीचे अमृत-स्वर मनास चिन्मय सुखाची तृप्ति देत होते... तिला कळेना, 'हें स्वप्न की जागृति?' ती म्हणते:—

हें स्वप्न म्हणूं की सत्य म्हणूं ?
हा नाद वेणुचा कृष्णाविण कां
भाव मनीं लागला विणूं...॥ धृ.॥

सप्तस्वर हें सप्तस्वर्ग की सप्तरंग तेजाचे
या मुरलीच्या स्वरांत मिसळो श्वासोच्छ्वास उरींचे
जीवनमुक्ता उधळुन लाभे
त्यास अता मी अमृत म्हणुं की मुक्ति म्हणूं...॥१॥



* हीं गीतें जुन्या हिंदी शास्त्रोक्त चिजांच्या चालीवर व मूळ चिजेचा अर्थ कायम ठेवून केलीं आहेत. मूळ कवींचीं नांवें शोध करूनहि सापडलीं नाहींत!

—ग्रंथकर्ता.



## संपला कृष्णावरचा रोष! ....११

*गायक : श्री. मधुकर वाळखडे*

● ● ● मथुरेंत कंसाने बलराम–कृष्णाच्या वधाची जय्यत तयारी करून ठेवली होती. विरोध–भक्तीने कृष्णाच्या हातून सद्गति प्राप्त करून कंस आपल्या माहुतास व मल्लवरांना शेवटच्या सूचना देत होता ● ● ●




( ताल–जयमंगल )

कंसः-

वैरी कृष्ण येतां–सोडा ऐरावता ।
चाणुर मुष्टिका–कर युद्धाची सिद्धता ॥ ध्रु. ॥

प्रियतम पूतनेला दुष्टाने शोषिले ।
कालियास हरविले, मध्वादिक ठारिले ।
हातीं शस्त्र येतां घेऊं सूड पुरता ॥ १ ॥

गवळ्याचें पोर तें समर्थ का मजपुढे ?
–नंदगृहीं गोकुळीं दडलें जें बापुडें
ईश्वर भ्याड कैसा ? पिचतो पदिं, देखतां ॥ २ ॥

(त्रिताल) पुत्रदर्शना आसुसलेल्या देवकि–वसुदेवा,
दृष्टीसन्मुख विछिन्न करितो ममतेचा ठेवा ।

त्या रात्रीं मज तुम्ही फसविलें अता मना सांभाळा,
कपटाने जो पळवुनि नेला बाळकृष्ण काळा ।

विवाह–दिन तो शापवाणिचा क्षणास या आठवा
" ठार करिल रे या बहिणीचा पुत्र तुला आठवा "

चिंता चित्तीं मुळी न ठेवा तुमचें बाळ गुणी
सातहि भावंडां भेटाया धाडिन यमसदनीं ॥ ३ ॥

मथुरानिवासी:-

जयजयकार ! जयजयकार !! जयजयकार !!!
यदुनाथा, तव जयजयकार !
मुकुंद माधव जयजयकार !
श्यामसुंदरा जयजयकार !
कृष्ण-कन्हैया जयजयकार !!

कंस:-

( संतापातिरेकानें अक्रुरास विचारूं लागला- )
हा कसला जयघोष ? अक्रुरा,
हा कसला जयघोष ?
अधीर माझे श्रवण ऐकण्या ज्याचा दुःखाक्रोश
त्याचा हा जयघोष ?-थांबव हा जयघोष ॥ धृ. ॥

मथुरानिवासी:-

मुकुंद माधव जयजयकार ! जयजयकार !
श्यामसुंदरा जयजयकार ! जयजयकार !
कृष्ण-कन्हैया जयजयकार ! जयजयकार !!

कंस:-

दोन बालकें द्वारीं दिसती-
मतंगजाची जिरवित मस्ती ।
चित्कारुन धरणीवर पडला-
शक्तीचा अधिकोष ।
थांबव हा जयघोष ॥ १ ॥

## कंसवध



" विमुक्त झालो कृष्णस्वरूपीं ! अतां संपला कृष्णावरचा रोष !! "

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 32034 वि: ...
क्रमांक ...1559... नोंः दि ...

मथुरानिवासी:-

मुकुन्द माधव जयजयकार ! जयजयकार !!
श्यामसुंदरा जयजयकार ! जयजयकार !!
कृष्ण–कन्हैया जयजयकार ! जयजयकार !!

कंस:-

चाणुर मुष्टिक तुटून पडले,
बालकृष्ण बलरामहि भिडले,
मल्लवरांचीं पिचलीं नरडीं–
–कंठीं पडला शोष ।
थांबव हा जयघोष ॥ २ ॥

मथुरानिवासी:-

मुकुन्द माधव जयजयकार ! जयजयकार !!
श्यामसुन्दरा जयजयकार ! जयजयकार !!
कृष्ण–कन्हैया जयजयकार ! जयजयकार !!

कंस:-

नेत्रांतुन श्रवणांतुन घुसला कृष्ण सले या उरीं–
भिंतींतुन स्तंभांतुन दिसतो कृष्ण शिरे मत्शिरीं ।
देहाच्या कणकणांत होई कृष्णाचा उद्घोष ॥
थांबव हा जयघोष ॥

मथुरानिवासी:-

मुकुन्द माधव जयजयकार ! जयजयकार !!
श्यामसुन्दरा जयजयकार ! जयजयकार !!
कृष्ण-कन्हैया जयजयकार ! जयजयकार !!

कंस:–

सर्वांगाला कंप भरे अन् खड्ग थरारे करीं
कुठे करावा वार सुचेना असंख्य कृष्णांवरी।

( खड्गाघाताने विव्हल होऊन )

हाय ! कुणी हा केला हृदयीं प्रहार खड्गाचा
कोण कोण रे ? पुत्र आठवा, तूंच देवकीचा।
विमुक्त झालों कृष्णस्वरूपीं अता संपला
कृष्णावरचा रोष–
अक्रुरा, चालूं द्या जयघोष ॥

मथुरानिवासी:–

मुकुन्द माधव जयजयकार ! जयजयकार !!
श्यामसुंदरा जयजयकार ! जयजयकार !!
कृष्ण-कन्हैया जयजयकार ! जयजयकार !!





## थांब सारथ्या-! ....१२

गायिका : कु. पुष्पा कुऱ्हेकर

●●● कंसवध करून श्रीकृष्णाने आपल्या मातापित्यांची सर्व राजवंश्यांसह कारागृहांतून मुक्तता केली आणि मथुरेच्या गणराज्याच्या सिंहासनावर वृद्ध उग्रसेनास बसविलें ! मथुरेची सुखसमृद्धि पुनः सुरक्षित झाली... पण...

पण कंसवधामुळे गतधवा झालेल्या आपल्या कन्यांचीं पांढरीं फटफटित कपाळें पाहून मगधाधिपति सम्राट जरासंध क्रुद्ध झाला ! जरासंधाच्या अवाढव्य सैन्याने मथुरेला वेढा दिला. पण... व्यक्तीसाठी राज्यावर नष्टचर्य ओढवूं नये म्हणून कृष्णाने मथुरा सोडून अज्ञातवासांत विद्यार्जन करण्याचें ठरविलें. त्याप्रमाणे अवंतीच्या पावन आश्रमांत, गुरु सांदीपनींच्या प्रेमळ सहवासांत राहून बलराम–कृष्णांचें विद्यार्जन होऊं लागलें. कृष्णाने आपल्या लोभस स्वभावाने आश्रमांत 'गोकुळ' निर्माण केलें होतें ! गुरु सांदीपनी आणि गुरु–पत्नीस तर कृष्णाच्या रूपाने आपला मृतपुत्रच जिवंत

झाला असें वाटूं लागलें. यथाकाल विद्याभ्यास पूर्ण झाल्यावर एक दिवस प्रातःकालीं . . .

गुरुपूजा संपली . . . गुरुपुत्रास पुनः जिवंत करून गुरुदक्षिणा दिली अन् अशा तऱ्हेने पूजेची सांगता झाली . . . तरीहि कृष्णाचें पाऊल आश्रमांतून निघेना ! मथुरेकडे जाण्यासाठी रथ सिद्ध होता . . . अन् सारथी कृष्णास पुनः पुनः सांगत होता . . . 'महाराज, दुष्ट जरासंध आपल्या मागावर आहे. घटका दो घटकांनी सूर्यास्त होईल, तत्पूर्वी आपणांस मथुरेस पोहोचलेंच पाहिजे ! ' सारथ्याचा चेहरा चिंताक्रांत पाहून कृष्ण रथांत बसला पण त्याची दृष्टि मात्र सांदीपनींच्या आश्रमाकडे खिळून होती . . . सारथ्याने भरधाव घोडे फेकले . . . त्या आश्रमभूमींतून जातांना कृष्णाला 'गोकुळ' आठवलं . . . 'मथुरा' आठवली ! तो गद्गदून म्हणाला ● ● ●

# थांब सारथ्या



थांब सारथ्या ! आश्रमांत या दृष्टी रेंगाळते !
माझें 'गोकुळ' माझी 'मथुरा', येथ गमे नांदते ! ॥ धृ. ॥

इवले इवले हात दिले मज मथुरेच्या मातीने ।
निर्जिव हातां सशक्त केलें गोकुळच्या दुग्धाने !
या हातांच्या कर्मभूमितुन जातां मन विधते ! ॥ १ ॥

चिमण्या ज्योति नेत्रांच्या मम देवकिने दिधल्या !
स्नेहा पाजुन माईने त्या तेजस्वी केल्या !
ज्ञानचक्षुची दृष्टि परन्तु लाभत त्यांना इथे ! ॥ २ ॥

तुरुंगांतलीं बद्ध पाउलें नंदगृहीं रांगलीं !
कुंजवनीं जीं नाचनाचलीं मधुनादें रंगलीं !
कर्तव्याचा सुपंथ त्यांना गुरुमाता दाविते- ॥ ३ ॥

मातपित्याहुन पवित्र वाटे श्रीगुरुदेव मला
व्रजमथुरेहुन वत्सल वाटे आश्रम हा मजला ।
अज्ञानाचें तमिस्र भीषण जेथे तेजाळतें ॥ ४ ॥





# अम्बेच्या मंदिरीं! ....१३

*गायिका : कु. कुमुद हिरूरकर*

●●● अशा तऱ्हेने साऱ्या भारतवर्षात श्रीकृष्णाच्या अलौकिक सामर्थ्याची कीर्ति पसरली! त्यामुळे पांडवांसारख्या पुण्यप्रतापी राजपुत्रांनी कृष्णाशी सख्य केले! सामान्य जनता तर कृष्णाला ईश्वराचा अवतार मानून मनोभावाने त्याची भक्ति करूं लागली! कित्येक राजकन्यांनी कृष्णाच्या रूपगुणकीर्तीने मोहित होऊन आपलीं हृदयें केव्हाच कृष्णार्पण केलीं होतीं! विदर्भ राजकन्या रुक्मिणीनेहि अशीच मनांतल्या मनांत कृष्णप्रीति बाळगिली होती. पण...

...पण तिचा पिता राजा भीमक, याने मात्र तिचें स्वयंवर मांडलें! श्रीकृष्णाला स्वयंवराचें निमंत्रण नाही, हें पाहून रुक्मिणीने सुदेव नांवाच्या एका विश्वासू ब्राह्मणाजवळ आपली प्रणयपत्रिका देऊन ती श्रीकृष्णास नेऊन देण्यास सांगितलें. अंबेच्या मंदिरांत त्या ब्राह्मणास निरोप देत असतांना प्रणयार्त रुक्मिणी आवर्जून म्हणाली... ●●●




रुक्मिणी:-

कधी न नयनें पाहियला परि भरला मम अंतरीं
निळचा नभाला सांगा जपते छाया सरिता उरीं ॥ धृ. ॥

कल्पतरू मम स्वप्नफुलांनी तव स्मरणें फुलला ।
मानसांतलीं कमळें वेचुन माधव मी पुजिला ।
तें मृगजळ का ठरेल माझ्या नयनीं अश्रुसरी ॥ १ ॥

बंधुपिता मम तुझिया वांचुन रचिती स्वयंवरा–
मनोमनीं मी तुम्हास वरिलें न्यावें प्राणेश्वरा ।
मर्त्यनृपांची प्रीत अशाश्वत, चिन्मय प्रेम-हरी ॥ २ ॥

हेमदूषणें हंसती माझ्या निर्मल प्रीतीला
प्रेमभूषणें तव स्पर्शाचीं शोभो वैदर्भीला
विप्रवरा जा, प्रतीक्षेत मी अंबेच्या मंदिरीं ॥ ३ ॥



## मी स्वामी पतितांचा ....१४

*गायक : प्रा. मनोहर कासलीकर*

● ● ● रुक्मिणीप्रमाणेच सत्यभामादि राजकन्यांशीं श्रीकृष्णाने विवाह केले. त्याच वेळीं प्राग्ज्योतिषपुरचा राजा नरकासुर याचा वध करून, त्याने बंदीगृहांत कैद करून ठेवलेल्या सोळासहस्र सुस्वरूप राजकन्यांना श्रीकृष्णाने मुक्त केले! परंतु आमच्या समाजाने रीतिप्रमाणेच या राजकन्यांना पतित ठरविले! त्यांना माहेर मुकलें, –सासर पारखें झालें!! शेवटीं त्या सर्व श्रीकृष्णास शरण गेल्या! सत्यभामेच्या आग्रहास्तव द्वारकाधीशाने त्या सर्वांचा पत्नी म्हणून स्वीकार केला. ज्यांना जगाने पतित ठरविलें... त्यांना प्रभूने पावन केलें! पण समाजाने–प्रत्यक्ष मातुःश्री देवकीने देखील कृष्णाला दोष दिला! देवकीच्या मातृत्वाला श्रीकृष्णाच्या त्यागांत भोग दिसला! हें पाहून तो कर्मयोगी रुद्ध कंठाने म्हणाला... ● ● ●




माना मानव वा परमेश्वर मी स्वामी पतितांचा
'भोगी' म्हणुनी उपहासा, मी योगी कर्माचा ॥ धृ. ॥

'दैवजात दुःखांनी' मनुजा 'पराधीन' केलें
त्या पतितांचें केवळ रडणें मजला ना रुचलें
भूषण रामा 'एकपत्निव्रत' मला नको तसलें
मोह न मजला कीर्तीचा मी नाथ अनाथांचा ॥ १ ॥

रुक्मिणि माझी सौंदर्याची प्रगटे जणुं प्रतिमा
किंचित हट्टी परन्तु लोभस असे सत्यभामा
तरीहि वरितों सहस्रसोळा कन्या मी अमला
'पराधीन' ना समर्थ घेण्या वार कलंकाचा ॥ २ ॥

कर्तव्याला मुकतां माणुस, माणुस ना उरतो
हलाहलातें प्राशुन शंकर देवेश्वर ठरतो
जगतां देण्या संजीवन मी 'कलंक' आदरितों
वत्सास्तव मम ऊर फुटावा वत्सल मातेचा ॥ ३ ॥





चिंधी ....१५

गायक : श्री. प्रभाकर देशपांडे

● ● ● एकदा नारदमुनींनी भगवान् श्रीकृष्णास सहज प्रश्न केला की 'तुझी सख्खी बहीण सुभद्रा हिच्यापेक्षा द्रौपदीवर तुझी ममता अधिक कां ? श्रीकृष्णांनी न बोलतांच उत्तर दिलें ! एका शस्त्राने त्यांनी आपली करांगुलि चिरली अन् नारदास सांगितलें की 'तू जाऊन ही वार्ता सुभद्रेस कळव'. नारदमुनि तडक सुभद्रेच्या महालांत गेले अन् सुभद्रेला पाहतांच म्हणाले... ● ● ●

चिंधी-




शुद्ध जिव्हाळा औषध त्याचें चिंधी ममतेची . . . !

# चिंधी



नारद:–

देवि सुभद्रे ! श्रीकृष्णाची करांगुली चिरली–!
जाई सत्वर ! रक्ताची गे धार नसे खळली ! !

सुभद्रा:–

( अभिवादन करीत )

यावें मुनिवर, ठाऊक मजला कृष्णाची घाई;
चंचल त्याचा स्वभाव भारी, सगळे घाई घाई !
अशीच जाउन चिडविन त्याला; लाभे ही संधी;
थांबा क्षणभर घेउन येतें शोधुनिया चिंधी ॥

नारद:–

धन्य सुभद्रे ! बंधुप्रीत तव आज मला कळली !
जा शोधाया चिंधी; बघ ती द्रुपदसुता आली !
( सुभद्रा घाईने निघून जाते. द्रौपदी आलेली पाहून– )
ऐक द्रौपदी, श्रीकृष्णाची करांगुली चिरली
काय करावें ? रक्ताची तर धार नसे खळली ।
वेड काय हें ? अवचित आले अश्रू तव नयनीं– ?
काय फाडिशी अमोल शालू–? गेली ही धावुनी !
( द्रौपदी निघून जाते. सुभद्रा प्रवेश करते. )

सुभद्राः–

कुठे न गवसे चिंधी मुनिवर येथे राजमहालीं

नारदः–

हवी कशाला ? पांचालीने अताच गे नेली !
काय म्हणावें त्या वेडीला ? शालू फाडुनिया–
–चिंधी करुनी सत्वर गेली अपुरें ऐकुनिया !
तो बघ आला प्रभुवर माझा ! कृष्णेसह हंसला–

( अभिवादन करीत )

या श्रीकृष्णा, पुरें उमजलें भगिनिप्रेम मजला !

( श्रीकृष्ण द्रौपदीसह येतो. )

श्रीकृष्णः–

घाव जिव्हारी लागुन होता तगमग चित्ताची–
शुद्ध जिव्हाळा औषध त्याचें, चिंधी ममतेची।
तसलें औषध, तसली चिंधी, कृष्णेला लाभे
माय यशोदा तशी द्रौपदी, बहिण मला शोभे

सुभद्राः–

( हिरमुसली होऊन )

क्षमा करावी भाऊराया; पुरती मी चुकलें...
डाव साधला या सवतीने ! असें कसें घडलें ?
सांग द्रौपदी, शालू फाडुन चिंधी कां नेली ?

द्रौपदीः–

( गहिवरून )

अनंत वसनें ज्याचीं लेउन, काया सुरक्षिली
त्यास्तव मानूं निर्जिव लेणें मूल्यवान कैसें ?
जिवभावाचें वस्त्र विणावें अर्पावें तैसें ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे स्थळप्रत.
अनुक्रम .. ............ विः ..........
क्रमांक ...................... नोंः दिः ..............

**द्रौपदी व नारदः–**

नमो गोविन्दाय !

नमो गोविन्दाय !

( द्रौपदी व नारद श्रीकृष्णास अभिवादन करतात.
सुभद्रेच्या डोळयांत आंसवें भरून येतात ! )



## रे सुदामा ! बैस या सिंहासनीं ! ....१६

*गायक : प्रा. मनोहर कासलीकर*

● ● ● अशा तऱ्हेने श्रीकृष्णांनी नारदमुनींचें समाधान केलें. पुढे यथाकालीं जरासंधादि शत्रूंचा निःपात करून आपल्या मनांतील एक दिव्य स्वप्न साकार केलें ! द्वारकेंत गोपाळांचें राज्य स्थापून त्याचा सर्वाधिकारी म्हणून हलधरास सिंहासनावर बसविलें.

परंतु हलधराच्या राज्यांत प्रजाजन सुखी आहेत असें समाधान वाटत नाही तोंच एक दिवस गुरु सांदीपनीच्या आश्रमांतला बालमित्र 'सुदामा' श्रीकृष्णास भेटावयास आला ! सुदाम्याचें अठराविश्वें दारिद्रय पाहून द्वारकाधीश कृष्णाचें 'सुराज्या'चें सुखस्वप्न भंग पावलें...! सुदाम्याच्या जीर्ण लक्तरांतून त्याला शासनकर्त्यांची जीर्णता दिसली... सुदाम्याच्या भुकेल्या डोळ्यांतून त्याला महालांत सुखाने रममाण होणाऱ्या राजांची अंधता दिसली.... राबणाऱ्या जनता–वहिनीने फाटक्या वस्त्रांत बांधून दिलेले 'कोरडे पोहे' पाहून त्याला आपल्या शासनसंस्थेचा तिटकारा आला ! अनुतापाच्या आसवांनी सुदाम्याची–नव्हे जनता-जनार्दनाची पूजा करण्याकरता त्या 'लक्ष्मीनारायणाने' 'दरिद्रि-नारायणास' निश्चयाने सांगितलें .... ● ● ●




श्रीकृष्ण:-

रे सुदामा !  बैस या सिंहासनीं
आसवांचे पूर येती कां तुझ्या रे लोचनीं ? ॥ धृ. ॥

जीर्ण वस्त्रें हीं तुझीं की शासकांची जीर्णता ?
तूं उपाशी सांपळा की शासकांची अंधता ?
दगड व्हावें वाटतें मज दीनता तव पाहुनी ॥ १ ॥

जीर्ण वस्त्रीं बांधलेली भेट वहिनी धाडिते
रूक्ष या पृथुकांतुनी जणुं माउली मज सांगते
" शुष्क संतत अन्न गिळितो दीन आम्ही राबुनी ॥ २ ॥

दीन हा जनताजनार्दन अंतरांतुन क्षोभतां-
राज्यसत्ता उलथण्या 'नरसिंह' होई जागता-!
वंद्य तो स्वामी नृपांना ध्येय व्हावा शासनीं
ना कुणी बलराम जगतीं रोधण्या तुज शासनीं ॥ ३ ॥

आसवांना सिंचुनी मी पूजिले तुज आजला
मी महालीं मंचकावर तूं उपाशी हिंडला ॥
परम-ईश्वर धन्य झालों तव पदां मी वंदुनी ॥ ४ ॥

ॐ नमो जनताजनार्दनाय- !
ॐ नमो दरिद्रिनारायणाय !!
ॐ नमो जनताजनार्दनाय !!!





## सुवर्णतुला ....१७

गायक: श्री. मनोहर कवीश्वर

●●● सत्यभामा अन् रुक्मिणीसह अष्टनायिकांप्रमाणे साऱ्याच राण्या श्रीकृष्णावर विशुद्ध प्रेम करीत होत्या ! पण सत्यभामेला वाटे की आपल्याइतकें प्रभूवर कुणीच प्रेम करीत नाही... आणि इतकेंच नव्हें तर 'यदुनाथां'चें देखील इतरांपेक्षा आपल्यावरच अधिक प्रेम आहे ! यामुळे ती रुक्मिणीआदि इतर राण्यांच्या शुद्ध भक्तीचाहि उपहास करूं लागली.... हें पाहून भगवान् श्रीकृष्णास वाईट वाटलें. पण ते निराश होऊनहि बसले नाहीत किंवा सत्यभामेला उपदेश करण्याच्याहि भानगडींत पडले नाहीत ! गोकुळच्या खोडकर कृष्णाजवळ युक्त्यांना काय तोटा ? त्यांनी नारदांचें स्मरण केलें... 'नारायण...नारायण' करीत नारदजी प्रकट झाले...! हाताने खूण करून नारदास जवळ बोलाविलें अन् त्यांच्या कानांत कृष्णाने बराच वेळपर्यंत कांहीतरी सांगितलें...!

झालें ! दुसऱ्या दिवशीं प्रातःकालीं सत्यभामेच्या महालांत मोठ्या उत्सवाची तयारी चालू असल्याचें दिसत होतें...

प्रासादाच्या मंदिरांत पूजेची आरास मांडण्यांत आली होती. जिकडे तिकडे दास–दासींची धांदल चालू होती.

पण भगवान् श्रीकृष्ण एका आसनावर शांत बसून सारें पाहात होते. नारद एखाद्या लोभी ब्राह्मणाप्रमाणे पूजेचीं सर्व दानें सहर्ष स्वीकारीत होते. पूजा संपली अन् . . . काय झालें कुणास ठाऊक . . . नारदजी धनिकाच्या तोऱ्यांत कृष्णाला आज्ञा करीत म्हणू लागले . . . ●●●



# सुवर्णतुला

( संगीतिका )

[ स्थळ—सत्यभामेचा महाल ]

*नारद:—

घे वीणा ! श्रीकृष्णा ! अनुचर तूं माझा ।
मज दिधलें दान तुझें भामेने आज तुझ्या
तूं नच राजा ।। धृ. ।।

श्रीकृष्ण:—

उमज पडेना काय मुनिवरा वदतां तुम्ही असें ?
सांग भामिनी, मुनीवरांना प्रसादिलें कां सोमरसें ?

सत्यभामा:—

जन्मोजन्मीं पति लाभावे यदुवर माझ्या सौभाग्या
यास्तव केलें व्रत कांही मी, तुम्हा विसरलें सांगाया
व्रतपूर्तिस्तव नारदजींना तुमचें दान दिलें ।

श्रीकृष्ण:—

धन्य भामिनी, पतिनिष्ठा तव व्रत मजला कळलें !

*नारद:—

मग कसला हा विलंब ? टाकुन दे नृपसाजा ।
घे वीणा ! श्रीकृष्णा ! अनुचर तूं माझा ।। १ ।।

प्रासादाच्या मंदिरांत पूजेची आरास मांडण्यांत आली होती. जिकडे तिकडे दास–दासींची धांदल चालू होती.

पण भगवान् श्रीकृष्ण एका आसनावर शांत बसून सारें पाहात होते. नारद एखाद्या लोभी ब्राह्मणाप्रमाणे पूजेचीं सर्व दानें सहर्ष स्वीकारीत होते. पूजा संपली अन् ... काय झालें कुणास ठाऊक ... नारदजी धनिकाच्या तोऱ्यांत कृष्णाला आज्ञा करीत म्हणूं लागले... ●●●



# सुवर्णतुला

## ( संगीतिका )

[ स्थळ–सत्यभामेचा महाल ]

*नारद:–

घे वीणा ! श्रीकृष्णा ! अनुचर तूं माझा ।
मज दिधलें दान तुझें भामेने आज तुझ्या
तूं नच राजा ।। धृ. ।।

श्रीकृष्ण:–

उमज पडेना काय मुनिवरा वदतां तुम्ही असें ?
सांग भामिनी, मुनीवरांना प्रसादिलें कां सोमरसें ?

सत्यभामा:–

जन्मोजन्मीं पति लाभावे यदुवर माझ्या सौभाग्या
यास्तव केलें व्रत कांही मी, तुम्हा विसरलें सांगाया
व्रतपूर्तिस्तव नारदजींना तुमचें दान दिलें ।

श्रीकृष्ण:–

धन्य भामिनी, पतिनिष्ठा तव व्रत मजला कळलें !

*नारद:–

मग कसला हा विलंब ? टाकुन दे नृपसाजा ।
घे वीणा ! श्रीकृष्णा ! अनुचर तूं माझा ।। १ ।।

श्रीकृष्ण:-

आज्ञा मुनिवर, क्षणांत येतो वल्कल नेसुनिया
सेवक होणें भाग मला वा जाइल व्रत वाया।
अगम्य आहे विधीलिखित हें, मानच दैवगती।
द्यूतामाजी पणा लाविली धर्माने ती पंचपती।
परन्तु माझ्या गेहीं विपरित, पत्नीने पतिदान दिलें,
जातों भामे, तुझ्या व्रतास्तव! नातें निज सरलें!
पुढल्या जन्मीं पति होण्यास्तव त्यजितों संग तुझा

नारद:-

तूं सेवक माझा ॥ २ ॥

( रुक्मिणीसह सप्तनायिका येतात )

सप्तनायिका:-

अभ्यागतान् अभिवादनम् देवर्षिम्
त्रैलोक्यप्रियम् नमामि नारदम् ॥

नारद:-

अखण्ड सौभाग्यवती भव।

श्रीकृष्ण:-

ऐक रुक्मिणी, दान दिलें गे भामेने मजला
अता चाललों व्रतपूर्तिस्तव, मुनिसह सेवेला

रुक्मिणी:-

क्षमस्व मुनिवर, अनुचित वाटे कसें कथूं वाचें
यदुनाथांचें पतिपण नाही केवळ भामेचें ॥
अगणित पत्नी ज्याच्या असती त्याचें दान असें-
भामेकरवीं तुम्ही घेतलें नारदजी कसें?

*नारद:-

ऐक सत्यभामिनी, सवतीमत्सर हा !
सरला संकल्प तुझा हंसलें कृष्ण पहा !

सत्यभामा:-

तुम्ही जाणिलें सत्य ! मुनिवरा, संकट मजवरती-
नाथप्रीतिचा द्वेष सदा ह्या सवती मम करिती ।।
स्वामी असतां राजी, आल्या मिळून या यक्षिणी
पतिहक्कास्तव भंग व्रताचा करिती एका क्षणीं ।

नारद:-

चल श्रीकृष्णा--

कृष्ण:-

जातो भामे--

सप्तनायिका:-

-थांबा यदुनाथा
जेथे राघव अमुचा जाइल तेथे येतिल सीता ।

नारद:-

(भयचकित) काय तुम्हीही आम्हांसवे येता ?
नारायण ! नारायण ! देवा, काय करूं आता

सत्यभामा:-

माझी प्रीती फोल ठरविण्या येतिल सान्या जणी
( कृष्णाचा हात धरून )
जाउं नका हो पतिराया, या बसा इथे आसनीं

नारद:-

( कृष्ण कांही बोलत नाही असें पाहून )
सांग कृष्णराया आता दोष हा कुणाचा ?

कृष्ण :—

प्रियाधीन आहे जगतीं पुत्र मानवाचा !

सत्यभामा :—

पतिदानाहुन दुजा, मुनिवरा, उपाय सांगा मला ।

नारद :—

उपाय दुसरा केवळ, शास्त्रीं करा सुवर्णतुला ।।
कृष्णतुल्य मज सोनें रत्नें द्याविस तूं देवी
त्या दानाने तुझ्या व्रताची पूर्ती गे व्हावी

सत्यभामा :—

धन्य मुनिवरा, क्षणीं जिरवितें सवतींचा गर्व
स्यमंतकाची शक्ति पणाला लाविन मी सर्व
सत्वर जा रे प्रतिहारींनो आणाया तूलिका
'धन कोषांतिल घेउन येण्या' सांगावें रक्षका ।
पतिव्रतेच्या पुण्याईने रत्नें तूळिन मी
शांत बसावें तोंवर मुनिवर घेण्या दान तुम्ही ।
सप्तनायिकांसह थांबावें इथेच गे रुक्मिणी ।
व्रतपूर्तीच्या आड येतसे बघतें काय कुणी ।
घेउनिया तूलिका बघा ते कोषाधिप आले ।
सोनें, रत्नें घेउन पाठी अनुचरही आले !!

*नारद :—

पारड्यांत बैस सख्या तुळण्यास्तव संपदा

कृष्ण :—

पत्नीच्या दानाने फसलों मी नारदा !

*नारद :—

पत्नीच्या नादाने भोग अता आपदा

मराठा ग्रंथ सं.
अनुक्रम 32034 वि. का.
क्रमांक 2549 नों. दि.

(एका पारड्यांत भगवान श्रीकृष्ण बसतात. दुसऱ्या पारड्यांत कोषाधिप सर्व संपत्ति ओततात. पण–)

**कोषाधिप:–**

सर्व संपदा निजकोषांतिल ओतियली देवी
प्रभु बसतांक्षणिं कशी अचानक भारहीन व्हावी?
आता सरलीं रत्नें सारीं, सोन्याचीं नाणीं
कसें तुळावें यदुवर कृष्णा सांगा मज कोणी!

**सत्यभामा:–**

घ्या कोषाधिप, अलंकार हे माझ्या तनुवरचे––

**सप्तनायिका:–**

वैभव अवघें घ्या पण द्यावें आम्हां प्रभु अमुचे ॥

**नारद:–**

नवल गमें प्रभु! तुझें पारडें जाईना वरती
राण्यांचें तव अलंकारही तुळेस ना पुरती।
घेउन जातों श्रीकृष्णाला अता तुझ्या वचनें

**रुक्मिणी:–**

क्षणैक थांबा सरली नाही तुलना पूर्णपणें।

**नारद:–**

अलंकार का नवा गवसला रुक्मिणिदेवि तुला

**रुक्मिणी:–**

जड लक्ष्मीने कैसी होइल प्रभुची रत्नतुला?
अस्तीत्वावर (चीं) तुळशीपत्रें माझ्या ठेवुनिया
ममात्मरूपी अमूल्य माणिक पणास लावुनिया
पतिसेवेच्या पुण्याईने तुळीन मी नाथा
पतिव्रतेची लाज राखण्या धावा यदुनाथा

(भक्तिपूर्वक तुळशीपत्र ठेवते तोंच प्रभूचें पारडें खाली येतें)

**नारद:–** (आश्चर्यानें)

धन्य रुक्मिणी ! पतिभक्ती तव-धन्य कृष्णलीला–
भावभक्तिचीं तुळशीपत्रें तुळती कृष्णाला ।

**सत्यभामा:–**

क्षमस्व यदुवर ! कळून आली व्रतकर्माची निष्फलता ।
भक्तिभावना श्रेष्ठ साधना मुक्तिस्तव भक्तां ॥

**रुक्मिणी:–**

भावभक्तिचीं पानफुलें हीं देवाहुन भारी
मुक्तीहुन मज श्रेष्ठ गमें तव भक्ति, चक्रधारी ॥

नमो वासुदेवाय ! नमो नारायणाय !!



* नारदाचे हे गीतांश ताल एकतालमध्ये रचलेले आहेत.
—ग्रंथ कर्ता

## धर्मयुद्ध माजलें! ....१८

*गायक : श्री. वसन्तराव खरे*

●●● सुवर्णतुलेचा प्रसंग घडवून आणला आणि भगवान् श्रीकृष्णाने मोठ्या कुशलतेने 'खऱ्या पातिव्रत्याचा आदर्श' सत्यभामेपुढे ठेवला आणि विशुद्ध पतिभक्तीचा महिमा कळून आल्यामुळे श्रीकृष्णाच्या अंतःपुरांतील ईर्ष्येचें वातावरण पूर्णपणें निवळलें! आपल्या गृहजीवनांत तर श्रीकृष्णाने शांतता प्रस्थापित केली; पण भारताच्या राजकीय जीवनांत मात्र अजूनहि असंतोष वाढत होता... सामान्य जनतेचीं सुखें राज्यकर्त्यांच्या दुष्ट महत्त्वाकांक्षांच्या ज्वालेंत भस्मसात् होत होतीं! अजूनहि इंद्रप्रस्थास अल्पसंख्यांक पण सत्प्रवृत्त पांडवांवर सत्ताधीश स्वार्थी कौरव अन्याय करीत होते. त्यांच्यांतील वैर मिटविण्याचा श्रीकृष्णांनी आटोकाट प्रयत्न केला. पण कृष्णशिष्टाई व्यर्थ ठरली... आणि तीच कृष्णाची पण इच्छा होती! अखिल भारतवर्षात एकछत्री अखण्ड धर्मराज्य नांदण्यासाठी कपटबुद्धि कौरवांचा उच्छेद होणें अपरिहार्य होतें! मंत्रयुद्धपटु दुष्ट धृतराष्ट्रालासुद्धा कौरव-पांडवांत युद्ध व्हावें असेंच वाटत होतें! ...

अखेर पांडवांची मागणी फेटाळल्या गेल्यामुळे त्यांनी कौरवांविरुद्ध युद्ध पुकारलें ! दोन्ही पक्षांचें मिळून अठरा अक्षौहिणी सैन्य कुरुक्षेत्रावर उपस्थित झालें ! म्हाताऱ्या क्रूर धृतराष्ट्राला आपल्या पुत्रांचा पराक्रम पाहण्यासाठी जिवाचे डोळे करावे असें वाटत होतें... पण... दिव्य-दृष्टि संजयाने त्याचें समाधान केलें... आणि कुरुक्षेत्रावर काय काय घडत आहे हें दिव्य दृष्टीने पाहून त्याचें वर्णन अधीर धृतराष्ट्रास तो सांगूं लागला... ●●●




संजय :–

धर्मयुद्ध माजलें, कुरुक्षेत्र गर्जलें !
नौबती निनादल्या, समरिं शिंग नादलें ।। धृ. ।।

शस्त्रास्त्रें घेउनी, अठरा अक्षौहिणी
सैन्य करिती गर्जना, जात नभा भेदुनी !
कौरव अन् पंडूसुत समरांगणि पातले ।। १ ।।

युद्धसिद्ध गर्वोद्धत अर्जुन मग बोलला,
"श्रीकृष्णा क्षणभरांत जिंकिन मी शत्रुला ।
"रणवाद्यें ऐकुनिया बाहू मम स्फुरलें ।। २ ।।

"मध्यान्तरिं सैन्यांच्या नेइ रे रथा
शत्रूदल गलितधैर्य होत सर्वथा ।
मम धनुचा टणत्कार ऐकुन रिपु कांपले !" ।।३।।

कृष्ण मनीं हांसले पार्थवचन ऐकतां–
कौरव–सेनेसन्मुख थांबवी रथा ।
परि सन्मुख बघतां क्षणि पार्थहृदय थरकलें ! ! ।।४।।

पाहतां पितामह, गुरु, स्वकिय सज्जना–
अनुतापें सदयता मोही मग अर्जुना ।
थरथरलें धैर्य-शौर्य ! आंसु नेत्रिं दाटले ॥ ५ ॥

वदे शस्त्र त्यागुनी उतरतां रथांतुनी ।
"नको मुकुट, नको कीर्ति आप्तजना ठारुनी
नको भोग भीषण जे रक्तानें रंगले" ॥ ६ ॥





## कर्तव्याने घडतो माणुस ....१९

*गायक : प्रा. मनोहर कासलीकर*

**" नको मुकुट नको कीर्ति आप्तजना ठारुनी**
**नको भोग भीषण जे रक्ताने रंगले "**

● ● ● असें म्हणून पार्थाने शस्त्रत्याग केला. त्याची ही संमोहावस्था पाहून भगवान श्रीकृष्ण प्रतोद खाली ठेवून रथाखाली उतरले आणि शान्तपणें त्यांनी अर्जुनास कर्ममार्गाचा उपदेश केला.

साऱ्या वेदांचें सार असा तो महान् उपदेश सहस्त्रावधि वर्षांपासून ' भगवद्गीता ' म्हणून आजहि आम्ही वाचतों ! ती गीता प्राकृतांत ज्ञानेश्वरांनी सांगितली... लोकमान्य टिळकांनी ' गीतारहस्यांत ' सांगितली... पूज्य विनोबांनी ' गीताई 'त सांगितली... अन् तीच गीता अर्जुनाबरोबरच एका शेवटल्या चिमुकल्या गीतांत आपण ऐकणार आहोंत.

युद्धाचा सारा चित्रपट संजयाच्या दिव्यदृष्टीपुढून धृतराष्ट्राच्या मनःचक्षूपुढे सरकत होता. संजय म्हणाला, " समरांगणावर भयग्लानीने थरथरणारा अर्जुन पाहून श्री भगवान् म्हणाले-- ● ● ●




श्रीकृष्ण:-

विमोह त्यागुन कर्मफलाचा सिद्ध होइ पार्था ।
कर्तव्याने घडतो माणुस जाणुन पुरुषार्था ।। धृ. ।।

शस्त्रत्याग तव शत्रूंपुढती नच शोभे तुजला !
कातर होसी समरीं मग तूं पुरुषोत्तम कसला ?
घे शस्त्रातें सुधीर होउन रक्षाया धर्मार्था ।। १ ।।

कर्तव्याच्या पुण्यपथावर मोहाच्या फुलबागा ।
मोहीं फसतां मुकशिल वीरा, मुक्तीच्या मार्गा ।
इह-परलोकीं अशांतिने तव विक्रम झुकविल माथा ।। २ ।।

कुणी आप्त ना, कुणी सखा ना जगतीं जीवांचा ।
क्षणभंगुर ही संसृति आहे खेळ ईश्वराचा ।
भाग्य चालतें कर्मपदांनी ! जाण खऱ्या वेदार्था ।। ३ ।।

रंगहीन मी या विश्वाच्या रंगाने रंगलों ।
कौरवांत मी-पांडवांत मी-अणुरेणुंत भरलों ।
मीच घडवितों-मीच मोडितों उमज अता परमार्था ।। ४ ।।

कर्मफलातें अर्पुन मजला सोड अहंता वृथा !
सर्व धर्म परित्यजुनी येई शरण मला, भारता !
कर्तव्याची साद तुझ्या तुज सिद्ध करी धर्मार्था ॥ ५ ॥



अशा तऱ्हेने धर्मसंस्थापनेचें कार्य करून भगवान् श्रीकृष्णांनी मर्त्यांना फलाशाशून्य कर्तव्याचा आदेश दिला ! हेंच त्यांचें जीवितकार्य होतें..! त्यानंतर द्वारकेंत ते कित्येक वर्षें सुखसमृद्धींत राहिले ! शेवटीं 'आपलें उद्दिष्ट संपलें आहें' असें पाहून त्यांनी वृद्ध मातापित्यांना अखेरचें वंदन केलें अन् ते वनांत निघून गेले !

...एका वृक्षाखाली गुडघ्यांवर मान ठेवून बसले असतां एका शिकाऱ्याने हरीण समजून एक तीक्ष्ण बाण सोडला... अन्... पूतनेच्या वीषपानाने न मरणारा... मधुमुरादि ठार करणारा... मत्तहत्तीचा मद जिरवून त्यास मातींत लोळविणारा... चाणुरासारख्या बलाढ्य मल्लास पिचून टाकणारा... बलवन्त कंसाचा शिरच्छेद करून आपल्या

अलौकिक सामर्थ्याने त्रिभुवन गर्जविणारा व अखेर नरकासुरासारख्या शक्तिशाली योद्ध्याला समरांगणांत देह ठेवायला लावणारा सर्वसमर्थ परमात्मा मानवी शरीर टाकून चिरंतनांत विलीन झाला... ! धरणीमाता देवकीच्या डोळ्यांनी रडत होती. . रुक्मिणीचें मन होऊन सारी स्त्रीजात आकाशाच्या अनंत निळाईंत विश्वाचा हरवलेला नाथ शोधीत होती... सारे पौरुष अर्जुनाच्या रूपाने मार्गदर्शन करणाऱ्या दिव्य सारथ्याच्या अभावीं हताश झालें होतें... पण. .

पण अचानक विश्वाच्या दशदिशांतून... ब्रह्मांडाच्या अणुरेणूंतून–सृष्टीच्या कणाकणांतून एक मंजुळ–गंभीर ध्वनि स्पंदन करूं लागला... साऱ्या चराचर सृष्टीला अर्जुन मानून भगवंताने भगवद्गीतेंतच आश्वासन देऊन ठेवलें आहे. . .

" यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् "

नमो गोविंदाय ॥

REFBK-0011986
REFBK-0011986
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
११९८६



ठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
म 32036 ........ वि: ........
9449 ........ नों: दि: ........

अलौकिक सामर्थ्याने त्रिभुवन गर्जविणारा व अखेर नरकासुरासारख्या शक्तिशाली योद्धयाला समरांगणांत देह ठेवायला लावणारा सर्वसमर्थ परमात्मा मानवी शरीर टाकून चिरंतनांत विलीन झाला. . . ! धरणीमाता देवकीच्या डोळयांनी रडत होती. . रुक्मिणीचें मन होऊन सारी स्त्रीजात आकाशाच्या अनंत निळाईंत विश्वाचा हरवलेला नाथ शोधीत होती. . . सारे पौरुष अर्जुनाच्या रूपाने मार्गदर्शन करणाऱ्या दिव्य सारथ्याच्या अभावीं हताश झालें होतें. . . पण. .

पण अचानक विश्वाच्या दशदिशांतून. . . ब्रह्मांडाच्या अणुरेणूंतून–सृष्टीच्या कणाकणांतून एक मंजुळ–गंभीर ध्वनि स्पंदन करूं लागला. . . साऱ्या चराचर सृष्टीला अर्जुन मानून भगवंताने भगवद्‌गीतेंतच आश्वासन देऊन ठेवलें आहे. . .

" यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् "

नमो गोविंदाय ॥

REFBK-0011986
REFBK-0011986

...ठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
११९८६



...ठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
...म 32036 ......... विः ८१०५
9449 ......... नोंः दिः ७१५५